


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २४१ * नांदेड * बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# जरांगेंच्या भेटीसाठी आता सरकारचे शिष्टमंडळ जाणार नाही

## सरकार एक पाऊल पुढे येत असेल तर त्यांनीही समजून घ्यावे –विखे पाटील

**मुंबई (प्रतिनिधी)–** प्रसाद लाड, उदय सामंत आणि इतर मंत्र्यांचं शिष्टमंडळ मनोज जरांगे यांना भेटण्यासाठी जाणार होते. मात्र, आता हे शिष्टमंडळ जरांगे यांच्या भेटीसाठी जाणार नाही. तसेच, जरांगे अजूनही आपल्या भूमिकेवर ठाम असतील, तर तो त्यांचा निर्णय आहे. सरकार एक पाऊल पुढे येत असेल तर त्यांनीही समजून घ्यावे, असे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, जरांगे अजून ठाम असतील तर तो त्यांचा निर्णय आहे. शासनाकडून जे जे निर्णय करणे आवश्यक होते ते आपण केलेले आहेत. त्यात त्यांचे समाधान होत नाही. आपण प्रयत्न करत आहोत पण त्याच्या पलीकडे जाऊन त्यांच्या मनात काही अजूनही प्रश्न असतील तर ते आपण सोडवतच आहोत. शेवटी मराठा समाजाच्या व्यापक हिताकरता आपण निर्णय करत आहोत. त्या निर्णयाची अंमलबजावणी सुद्धा सुरू आहे. त्यात जरांगे पाटील समाधानी नाहीत. त्याच्यामुळे आता माझ्याकडे असा काही पर्याय नाही, ज्यामुळे मी त्यांचे समाधान करू शकेल, असे त्यांनी म्हटले.



विखे पाटील पुढे म्हणाले की, ५८ लाख नोंदी आम्ही ग्रामपंचायतीकडे डिस्प्ले केल्या आहेत. लोकांनी अर्ज केले आहेत. ५२० अर्ज आले. २४० अर्ज केवळ दाखले काढण्यासाठी होते. जशी वस्तुस्थिती पुढे येईल, वंशावळ बदल असतील त्याचे दाखले मिळतील. जे कोणी दिले नाही ते या दोन नेत्यांनी पुढे येऊन काम केलं आहे. ज्यांनी काम केलं त्यांना तुम्ही नावं ठेवत आहात. मराठी समाज हे मान्य करणार नाही. सरकार सकारात्मक नसेल तर भाग वेगळा होता. पण, २५–३० वर्षात असे चांगले निर्णय झाले नाही, असे म्हणत त्यांनी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यावर होत असलेल्या टीकेवर भाष्य केले.

### एकही मागणी मान्य नाही –जरांगे पाटील

१५ पैकी १२ मागण्या मान्य, याला न्याय देणं म्हणत नाहीत. खाली ते मान्य केलं जातं नाही, तुम्ही गरीबांचं वाटोळं केलं. तुम्ही मराठा समाजाला पश्चाताप करण्याच्या उंबरठ्यावर आणलं. तुम्हाला माहित नाही, मराठा समाज बाप आहे. समाजाला माहीत आहे, तुम्ही समाजाची पिळवणूक केली. तुम्ही शिष्टमंडळ म्हणून वेगळं बोलता, गाडीत बसल्यानंतर वेगळं बोलता, हॉटेलमध्ये असल्यानंतर वेगळं बोलता. तुम्ही काहीही मान्य केलं नाही, १५ पैकी एकही मागणी मान्य झालेली नाही, असे म्हणत सरकारने कुठलीही मागणी मान्य केली नसल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

# राज्यराणी एक्स्प्रेसमध्ये नोव्हेंबरपासून आधुनिक एलएचबी डबे धावणार

**नांदेड (प्रतिनिधी)-** नांदेड येथून नोव्हेंबरपासून राज्यराणी एक्स्प्रेसमध्ये आधुनिक एलएचबी डबे धावणार आहेत. यामुळे नांदेड ते मुंबई प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी हे सोयीचे होणार आहे.

नांदेड – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) – नांदेड राज्यराणी एक्स्प्रेसच्या जुन्या आयसीएफ डब्यांच्या जागी आता आधुनिक जर्मन तंत्रज्ञानाचे एलएचबी (Linke Hofmann Busch) डबे जोडण्याचा निर्णय दक्षिण मध्य रेल्वेने घेतला आहे. हे परिवर्तन नांदेडहून सुटणाऱ्या गाडी क्र. १७६११ साठी ४ नोव्हेंबर २०२६ पासून तर मुंबईहून सुटणाऱ्या गाडी क्र. १७६१२ साठी ५ नोव्हेंबर २०२६ पासून लागू होणार आहे.

नव्या रचनेनुसार राज्यराणी एक्स्प्रेस २ एलएचबी रेकसह एकूण १६ डब्यांसह धावेल. यात १ द्वितीय सामान–सह–दिव्यांगजन डबा, ४ सामान्य डबे, ५ स्लीपर (नॉन–एसी), १ एसी चेअर कार, २ एसी ३–टियर, १ एसी २–टियर, १ फर्स्ट एसी आणि १ गार्ड–सह–सामान डबा (जनरेटरसह) असतील. एलएचबी डब्यांमुळे प्रवास अधिक सुरक्षित, आरामदायी आणि स्थिर होणार असून अपघातावेळी एकमेकांवर न चढण्याच्या तंत्रज्ञानामुळे सुरक्षितता वाढते. दक्षिण मध्य रेल्वेने प्रवासी सेवांचे आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने हे आणखी एक पाऊल असल्याचे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# भारताशी व्यापार करणाऱ्या देशांमध्ये ‘यूपीआय’चा विस्तार करणार –नरेंद्र मोदी

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते ‘ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६’चे उद्घाटन

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतातील डिजिटल व्यवहारांच्या पलीकडे आता ‘यूपीआय’चा विस्तार भारताशी व्यापार करणाऱ्या देशांमध्ये करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न राहणार आहे. भारत–सिंगापूरदरम्यान यूपीआयच्या माध्यमातून व्यवहार करणे दोन भारतीय शहरांमधील व्यवहाराइतकेच सुलभ झाले असून, याच धर्तीवर भारताशी व्यावसायिक संबंध असलेल्या अन्य देशांमध्येही यूपीआयचे जाळे विस्तारण्याची भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी मुंबईत मांडली. ‘यूपीआय’ हा भारताच्या फिनटेक क्षेत्रातील परिवर्तनाचा प्रमुख आधार असून, त्याचा उल्लेख केल्याशिवाय भारताची फिनटेक कहाणीच अपूर्ण राहते, असे मोदी यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी बीकेसी येथील ‘जिओ वर्ल्ड’ सेंटरमध्ये ‘ग्लोबल फिनटेक फेस्ट’ २०२६ चे उद्घाटन झाले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. या जागतिक फिनटेक महोत्सवाची सातवी आवृत्ती ८ ते ११ सप्टेंबर या कालावधीत



मुंबईत आयोजित करण्यात आली आहे. उद्घाटन सोहळ्याला जगभरातील तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी मोदी यांनी भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेतील यूपीआयच्या भूमिकेचा विशेष उल्लेख केला. २५ ऑगस्ट रोजी यूपीआयने दहा वर्षे पूर्ण केली. दहा वर्षांपूर्वी ‘तुमची बँक तुमच्या हातात असेल’ असे सांगितले असता अनेकांना ते अशक्य वाटत होते, अशी आठवण मोदी यांनी करून दिली. यूपीआयमुळे आर्थिक सेवा अधिक सुलभ आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

## नांदेड परिक्षेत्रात अवैध धंद्यांवर डीआयजी उमाप यांचा हातोडा

# पहिल्याच आठवड्यात ३४१ गुन्हे, ५.६३ कोटींचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड परिक्षेत्रात (नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली) अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम–३ राबवण्यात येत आहे. या मोहिमेच्या पहिल्या आठवड्यात तब्बल ३४१ ठिकाणी छापे टाकून ५२९ इसमांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून ५ कोटी ६३ लाख ४१ हजार ७५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. १ ते ३० सप्टेंबर, २०२६ दरम्यान, पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांचे मार्गदर्शनाखाली नांदेड परिक्षेत्रात गुटखा, मटका – जुगार, अवैध दारु विक्री, शस्त्र अधिनियम व इतर कलमांन्वये अवैध व्यवसाय निर्मूलन मोहिम –३ राबविण्यात येत आहे.

सदर मोहिमे अंतर्गत, दि. १ ते ७ सप्टेंबर, २०२६ दरम्यान संपलेल्या पहिल्या आठवड्यात, नांदेड परिक्षेत्रात, गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहिते अंतर्गत ८, महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत ५७, महाराष्ट्र दारुबंदी कायदयान्वये २१३, शस्त्र अधिनियमान्वये १०, तर इतर अधिनियमांखाली ५३, अशा एकूण ३४१ कारवाया करुन ५२९ इसमांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपींकडून ५ कोटी ६३ लाख ४१ हजार ७५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# आजोबांच्या अस्थी विसर्जनासाठी आलेल्या नातवाचा गोदावरी नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** आजोबांच्या अस्थी विसर्जनासाठी नातेवाईकांसोबत आलेल्या नातवाचा गोदावरी नदीपात्रात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी दुपारी येथील काळेश्वर मंदिर घाटावर घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली जीवरक्षक दलाच्या पथकाने दीड तासाच्या अथक परिश्रमानंतर मृतदेह पाण्याबाहेर काढला.



ओमकार तगरे (वय २२) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो आपल्या नातेवाईकांसोबत विष्णुपुरी येथील काळेश्वर मंदिर परिसरात गोदावरी नदीत आजोबांच्या अस्थी विसर्जनासाठी आला होता. मंगळवारी दुपारी अस्थी विसर्जन करत असताना अचानक पाय घसरल्याने तो नदीच्या पात्रात पडला आणि बुडाला.

सदर घटनेची माहिती मिळताच नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक आणि गोदावरी जीवरक्षक दलाचे नूर पहिलवान यांच्या पथकाने तात्काळ शोधकार्य सुरू केले. सुमारे दीड तासाच्या अथक प्रयत्नांनंतर ओमकार तगरे याचा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात यश आले.

ओमकारच्या दुर्दैवी मृत्यूमुळे तगरे कुटुंबावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची (एडीआर) नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती. श्रावण महिन्यानिमित्त काळेश्वर मंदिराच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती.

# गोंदिया–बालाघाट महामार्गावर अपघात; ६ जणांचा जागीच मृत्यू, ७ गंभीर

**गोंदिया (प्रतिनिधी)–** गोंदिया–बालाघाट राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. गोंदियाच्या नागरा येथे भरधाव ट्रक आणि बोलेरो प्रवासी वाहनाची समोरासमोर धडक झाली. या अपघातात ६ जणांचा जागीच मृत्यू झाला असून ७ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# शेतकरी संघटनेने किनवटच्या महावितरण कार्यालयाला ठोकले टाळे!

**किनवट (प्रतिनिधी)–** शेतीपंपांचा खंडित वीजपुरवठा तत्काळ सुरळीत करावा, जळालेली व नादुरुस्त रोहित्रे त्वरित बदलावीत तसेच किनवट उपविभागातील प्रलंबित वीज समस्या मार्गी लावाव्यात, या मागण्यांसाठी शेतकरी संघटनेने मंगळवारी दि. ८ रोजी आक्रमक भूमिका घेतली. शेतकरी संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष रमेश कदम पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकऱ्यांनी किनवट येथील महावितरणच्या उपविभागीय अभियंता कार्यालयाला टाळे ठोकून ठिय्या आंदोलन केले.

किनवट तालुक्यातील गावठाण तसेच कृषी पंपांचा वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. त्यातच पावसाच्या खंडामुळे पिके संकटात असताना वीजपुरवठा सुरळीत नसल्याने उपलब्ध पाण्याचा उपयोग करून पिके वाचविणेही शेतकऱ्यांना कठीण झाले




आहे.किनवट उपविभागांतर्गत कृषी पंपांना वीजपुरवठा करणारी सुमारे १ हजार ५०० रोहित्रे आहेत. यापैकी अनेक रोहित्रे जळालेली किंवा नादुरुस्त असल्याने ती वेळेत बदलली जात नसल्याचा आरोप शेतकरी संघटनेने केला आहे. परिणामी शेतकऱ्यांना वारंवार वीज समस्येला सामोरे जावे लागत आहे.

यावेळी शेतीपंपांचा वीजपुरवठा सुरळीत करून २४ तास सिंगल फेज वीज उपलब्ध करून द्यावी, जळालेली व नादुरुस्त रोहित्रे तातडीने बदलून त्यांच्या जागी नवीन रोहित्रे बसवावीत, बोधडी बुद्रुक परिमंडळांतर्गत पारडी येथील मंजूर विद्युत उपकेंद्र तत्काळ सुरू करावे, तसेच इस्लापूर परिसरातील वाढता विद्युत भार लक्षात घेऊन नवीन विद्युत उपकेंद्र मंजूर करावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. याशिवाय बोधडीसह तालुक्यातील सर्व विद्युत उपकेंद्रांवर एस.डी.टी. रोहित्रे बसवावीत, जेणेकरून शेतकऱ्यांना सिंगल फेज वीज उपलब्ध होईल, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनाची माहिती मिळताच भोकर विभागाचे कार्यकारी अभियंता कुरेशी यांनी घटनास्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. शेतकऱ्यांनी मांडलेल्या विविध मागण्या रास्त असल्याचे मान्य करत संबंधित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्याचे लेखी व तोंडी आश्वासन त्यांनी दिले.

या आश्वासनानंतर शेतकरी संघटनेने आंदोलन तात्पुरते मागे घेत कार्यालयाचे टाळे उघडले. मात्र दिलेल्या आश्वासनांची वेळेत पूर्तता न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आला. या आंदोलनात कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सोपानराव केंद्रे, शेतकरी संघटनेचे अशोक शेलार, गुलाब हराळे, चांदराव चव्हाण यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी आणि तालुक्यातील शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



**नांदेड :** गुरूवारी साजरा होणाऱ्या पोळा सणानिमित्त शहरातील विविध बाजारपेठा सजल्या आहेत. दुकानांवर विविध प्रकारचे बैलजोडी व अन्य साहित्यांनी बाजारपेठ फुलली असल्याचे दिसून येत आहे. (छाया : करणसिंह बैस)




# वृद्ध महिलेला ‘सोन्याच्या बिस्कीट’चा गंडा

## बनावट बिस्कीट देऊन चैन लंपास करणारे दोन भामटे एलसीबीच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** सोन्याचे बिस्कीट असल्याचे भासवून वृद्ध महिलेची दिशाभूल करून सोन्याची चैन लंपास करणाऱ्या दोन सराईत भामट्यांना स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे.

दि. ७ सप्टेंबर रोजी पोउपनि नागनाथ तुकडे यांचे पथक धर्माबाद उपविभागात पेट्रोलिंग करीत असताना आंध्रा बसस्टँड परिसरात दोन संशयित इसम गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याची गुप्त माहिती मिळाली. पथकाला पाहताच दोघांनी पळण्याचा प्रयत्न केला, मात्र पाठलाग करून त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची नावे गणेश सुभाष वाघमारे (वय ३०) आणि महेश ऊर्फ सुनील अशोक वाघमारे (वय ३०), दोघे रा. साठेनगर, शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर अशी आहेत.

चौकशीत त्यांनी ८ ते १० दिवसांपूर्वी नगर परिषद रोड, धर्माबाद येथे एका वृद्ध महिलेला सोन्याचे बनावट बिस्कीट असल्याचे सांगून फसवणूक केल्याची कबुली दिली. त्या मोबदल्यात तिच्या गळ्यातील सोन्याची चैन काढून घेतल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी धर्माबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. २०९/२०२६ कलम ३१८(२)(३)(५) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल होता. अंगझडतीत त्यांच्याकडून ४८ हजार रुपये रोख जप्त करण्यात आले असून दोघांना धर्माबाद पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

ही कामगिरी पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि नागनाथ तुकडे, अंमलदार दारासिंग राठोड, मोहन हाके, लहू चाटे, आबाराव पिंगलवाड, महेश बडगू व अमोल सातारे यांनी केली.

# गणपती उत्सव: नांदेड-सावंतवाडी विशेष रेल्वेसेवा

## पुणे, कल्याण, पनवेलमार्गे कोकणासाठी थेट आणि सुविधाजनक रेल्वे सेवा

**नांदेड (प्रतिनिधी)–** गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांसाठी महत्त्वपूर्ण आणि विशेष सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. नांदेड–सावंतवाडी रोड नांदेड टीओडी विशेष रेल्वेगाडी क्र. ०७६५९/०७६६० चालविण्यात येणार असून, या विशेष सेवेमुळे मराठवाडा आणि महाराष्ट्रातील कोकण प्रदेश प्रथमच थेट रेल्वेसेवेने जोडला जाणार आहे.

ही विशेष रेल्वेसेवा गणपती उत्सवादरम्यान कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून, नांदेड, परभणी, लातूर, परिसरासह मराठवाड्यातील प्रवाशांना कोकणातील विविध ठिकाणी जाण्यासाठी थेट आणि सोयीस्कर रेल्वे प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

गाडी क्र. ०७६५९ नांदेड–सावंतवाडी रोड ट्रेन्स ओन डिमांड विशेष गाडी हुजूर साहिब नांदेड येथून १२ आणि १५ सप्टेंबर २०२६ रोजी (शनिवार आणि मंगळवार) रात्री २०:०० वाजता सुटेल आणि अनुक्रमे पुढील दिवशी सावंतवाडी रोड येथे सकाळी ०३:३० वाजता पोहोचेल.

परतीच्या दिशेने गाडी क्र. ०७६६० सावंतवाडी रोडहुजूर साहिब नांदेड ट्रेन्स ओन डिमांड विशेष गाडी सावंतवाडी रोड येथून दिनांक १४ आणि १७ सप्टेंबर २०२६ रोजी (सोमवार आणि गुरुवार) सकाळी ०७:३० वाजता सुटेल आणि अनुक्रमे पुढील दिवशी हुजूर साहिब नांदेड येथे सकाळी ११:३० वाजता पोहोचेल.

ही विशेष रेल्वेगाडी मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणातील अनेक महत्त्वाच्या शहरांना व पर्यटनस्थळांना जोडणार आहे. गाडीला पूर्णा जं., परभणी जं., परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, येडशी, बार्शी टाउन, कुर्डुवाडी, दौंड, पुणे, लोणावळा, कल्याण, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, कुडाळ आणि सावंतवाडी रोड येथे थांबे देण्यात आले आहेत. यामुळे मराठवाड्यातील प्रवाशांना रत्नागिरी, चिपळूण, कणकवली, कुडाळ, सावंतवाडी यांसह कोकणातील विविध भागात जाण्यासाठी थेट रेल्वेसेवेचा लाभ मिळणार आहे.

प्रवाशांनी या विशेष रेल्वेसेवेचा लाभ घ्यावा आणि प्रवासापूर्वी गाडीची अद्ययावत वेळ व आरक्षणाची उपलब्धता तपासावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# डीजे पाहिजेच कशाला?

गणपती उत्सव जवळ आला की, महाराष्ट्रातील वातावरण भक्तिमय होते. घराघरांत गणरायाच्या आगमनाची तयारी सुरू होते आणि सार्वजनिक मंडळांमध्येही उत्साह संचारतो. मात्र, याच उत्साहाला दरवर्षी डीजेच्या कर्णकर्कश आवाजाची किनार लाभते आणि त्यातून वाद निर्माण होतो. डीजेवर निर्बंध घातले की, काहीजण त्याला थेट हिंदूंच्या धार्मिक उत्सवावरील घाला ठरवतात; तर दुसरीकडे डॉक्टर, पर्यावरणतज्ज्ञ आणि नागरिक ध्वनिप्रदूषणाच्या गंभीर आरोग्यविषयक परिणामांकडे लक्ष वेधतात. या वादात खरा प्रश्न गणपतीचा नाही, तर आवाजाच्या मर्यादेचा आणि सार्वजनिक जबाबदारीचा आहे. धार्मिक स्वातंत्र्य हा लोकशाहीचा मूलभूत आधार आहे. गणेशोत्सव साजरा करण्याचा, मिरवणूक काढण्याचा आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. परंतु कोणताही अधिकार अमर्यादित नसतो. आपल्या आनंदामुळे दुसऱ्याचे आरोग्य, झोप, शांतता किंवा जगण्याचा अधिकार बाधित होत असेल तर त्या आनंदाच्या पद्धतीवर प्रश्न उपस्थित होणारच. हा प्रश्न केवळ गणेशोत्सवापुरता मर्यादित नसावा. ध्वनिप्रदूषणाचे नियम सर्व धर्मांच्या आणि सर्व सार्वजनिक कार्यक्रमांना समानपणे लागू झाले पाहिजेत. मानवी कानाची सहनशक्ती अमर्यादित नाही. सामान्य संभाषणाचा आवाज साधारण ६० डेसिबलच्या आसपास असतो. सुमारे ८५ डेसिबल किंवा त्यापेक्षा अधिक आवाजाचा दीर्घकाळ किंवा वारंवार संपर्क श्रवणशक्तीसाठी धोकादायक ठरू शकतो. आवाजाची तीव्रता जसजशी वाढते, तसतसा सुरक्षित संपर्काचा कालावधी कमी होतो. डीजेच्या प्रचंड आवाजात तासन्तास उभे राहणे म्हणजे केवळ कानांना त्रास देणे नव्हे; दीर्घकाळात श्रवणशक्तीवर कायमस्वरूपी परिणाम होण्याची शक्यता निर्माण करणे होय. कर्णकर्कश आवाजामुळे कानात सतत आवाज येणे, ऐकण्याची क्षमता कमी होणे, डोकेदुखी, चिडचिड, मानसिक ताण आणि झोपेचा त्रास होऊ शकतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि अभ्यास करणारे विद्यार्थी यांना त्याचा अधिक त्रास होऊ शकतो. त्यामुळे 'आवाज मोठा म्हणजे उत्सव मोठा' ही मानसिकता आता बदलण्याची वेळ आली आहे. खरे तर गणेशोत्सवाला डीजेची गरजच काय? गणरायाची आरती डीजेच्या भिंतीएवढ्या स्पीकरमधून ऐकवली तर भक्ती वाढते का? ढोल-ताशांचा नाद, लेझीम, झांज, टाळ, मृदंग, हलगी, भजन, कीर्तन या आपल्या समृद्ध परंपरांचा आवाज कमी प्रतिष्ठेचा आहे का? उलट, पारंपरिक वाद्यांकडे वळणे म्हणजे उत्सवाला त्याची सांस्कृतिक मुळे पुन्हा जोडणे होय. मात्र येथे एक महत्त्वाची खबरदारी आवश्यक आहे. डीजे नको म्हणून पारंपरिक वाद्यांना अमर्यादित आवाजाची मुभा देता येणार नाही. ढोल-ताशेही अत्यंत मोठ्या आवाजात, दीर्घकाळ वाजवले तर ध्वनिप्रदूषण होऊ शकते. त्यामुळे प्रश्न डीजे विरुद्ध ढोल-ताशा असा नसून मर्यादित आणि जबाबदार ध्वनिवापर विरुद्ध अमर्यादित ध्वनिप्रदूषण असा आहे. गणेश मंडळांनी या प्रश्नात प्रशासनाची वाट पाहण्याऐवजी स्वतः पुढाकार घ्यायला हवा. 'कमी आवाज, अधिक संस्कृती' अशी आचारसंहिता मंडळांनी स्वीकारली तर गणेशोत्सवाची प्रतिष्ठाच वाढेल. आवाजाच्या मर्यादा पाळणे, वेळेचे भान ठेवणे, रुग्णालये, शाळा, वृद्धाश्रम आणि निवासी भागांजवळ विशेष काळजी घेणे ही मंडळांची सामाजिक जबाबदारी आहे. प्रशासनाची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. नियम केवळ कागदावर ठेवून उपयोग नाही. ध्वनीमापक यंत्राद्वारे आवाजाची पातळी तपासली पाहिजे आणि नियमभंग करणाऱ्यांवर समान पद्धतीने कारवाई झाली पाहिजे. कारवाई करताना कोणता धर्म, कोणते मंडळ किंवा कोणाचा राजकीय दबाव याचा विचार होऊ नये. कायदा सर्वांसाठी समान असेल तरच त्याला सामाजिक स्वीकार मिळेल. गणपती बाप्पा हा विघ्नहर्ता आहे. त्याच्या उत्सवात दुसऱ्याच्या आरोग्याचेच विघ्न निर्माण करून आपण कोणती भक्ती साधत आहोत, हा प्रश्न प्रत्येक मंडळाने स्वतःला विचारला पाहिजे. उत्सवाची भव्यता स्पीकरच्या क्षमतेत नसते; ती भक्तीच्या भावनेत, संस्कृतीच्या जपणुकीत आणि सामाजिक शिस्तीत असते. यंदाचा गणेशोत्सव त्यामुळे एका नव्या संकल्पाचा ठरू शकतो, गणरायाचा जयघोष आकाश फाडणारा नव्हे, तर मनाला भिडणारा असावा. डीजेच्या आवाजाची स्पर्धा नको; परंपरेच्या नादाची ओळख हवी. भक्तीला डेसिबलची गरज नसते. गणपती बाप्पाचा उत्सव हा श्रद्धेचा असावा, ध्वनिप्रदूषणाचा नाही!

# गणेशोत्सव असावा भक्तीचा, सामाजिक बांधिलकीचा आणि विधायक कार्याचा



लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक आणि सामाजिक स्वरूप देऊन आज सुमारे १३३ वर्षे झाली आहेत. भारतीय समाजाला एका व्यासपीठावर आणणे, लोकांमध्ये एकोपा निर्माण करणे, तरुणांना संघटित करणे आणि त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करणे, या व्यापक उद्देशाने लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात केली. ब्रिटिश राजवटीत भारतीयांवर अनेक प्रकारचे निर्बंध होते. समाजातील विविध घटकांमध्ये एकजूट निर्माण करून स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी जनजागृती करणे आवश्यक होते. ही गरज ओळखून टिळकांनी धार्मिक उत्सवाला सामाजिक आणि राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप दिले. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजजागृतीचे प्रभावी माध्यम बनला.

हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला. आज महाराष्ट्रातच नव्हे, तर देशाच्या विविध भागांत मोठ्या उत्साहाने गणेशोत्सव साजरा केला जातो. गणरायाच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत सर्वत्र भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण असते. घरोघरी गणेशाची प्रतिष्ठापना केली जाते. सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गणेशभक्त मोठ्या श्रद्धेने गणरायाची पूजा-अर्चा करतात. त्यामुळे गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे.

मात्र, गेल्या काही वर्षांत या उत्सवाच्या स्वरूपात काही चिंताजनक बदल झाले आहेत. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला होता, त्या उद्देशापासून आपण दूर तर जात नाही ना, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. भक्तीपेक्षा दिखावा, सामाजिक बांधिलकीपेक्षा स्पर्धा आणि साधेपणापेक्षा भपका यांना अधिक महत्त्व मिळू लागल्याचे चित्र काही ठिकाणी दिसते. गणेशोत्सव हा उत्सव न राहता काही ठिकाणी जणू 'इव्हेंट' बनत चालला आहे, ही बाब निश्चितच चिंताजनक आहे.

गणेशोत्सवात उंचच उंच मूर्ती बसविण्याची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. मोठी मूर्ती म्हणजे मोठी प्रतिष्ठा, असा गैरसमज निर्माण होत आहे. मूर्तीचा आकार वाढत जातो; मात्र भक्तीची उंची त्याबरोबर वाढतेच असे नाही. मोठ्या मूर्तींची प्रतिष्ठापना आणि विसर्जन करताना अनेक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे गणेशमूर्तीच्या आकारापेक्षा तिच्यामागील श्रद्धा, संस्कार आणि सामाजिक संदेश महत्त्वाचा आहे. अनावश्यक मोठ्या मूर्तींचे प्रदर्शन करण्यापेक्षा पर्यावरणपूरक आणि सुबक गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करणे अधिक योग्य ठरेल.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही आजची खरी गरज आहे. शाडूच्या मातीपासून बनविलेल्या गणेशमूर्तींना प्राधान्य दिले पाहिजे. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती पाण्यात सहज विरघळत नसल्यामुळे विसर्जनानंतर जल-प्रदूषणाची समस्या निर्माण होऊ शकते. नदी, तलाव आणि समुद्र हे आपल्या पर्यावरणाचे महत्त्वाचे घटक आहेत. गणरायाचे विसर्जन करताना या जलस्रोतांचे प्रदूषण होणार नाही, याची काळजी घेणे ही प्रत्येक गणेशभक्ताची जबाबदारी आहे. कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर, शाडूच्या मातीच्या मूर्ती आणि पर्यावरणपूरक सजावट यांचा स्वीकार करून गणेशोत्सव अधिक निसर्गस्नेही करता येईल.

गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी-प्रदूषणाचा प्रश्नही गंभीर बनतो. मोठ्या आवाजातील ध्वनिवर्धक, डीजे आणि कर्णकर्कश संगीतामुळे परिसरातील नागरिकांना त्रास होतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्ण तसेच परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या ध्वनी-प्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागू शकतो. उत्सवाचा आनंद घेताना इतरांच्या शांततेचा आणि आरोग्याचा विचार करणे आवश्यक आहे. धार्मिक उत्सवाच्या नावाखाली ध्वनीची मर्यादा ओलांडणे योग्य नाही. भक्ती ही मोठ्या आवाजात नव्हे, तर मनापासून केली जाते. वर्गणी हा देखील गणेशोत्सवातील महत्त्वाचा प्रश्न आहे. गणेश मंडळांनी नागरिकांकडून स्वेच्छेने मिळणारी वर्गणी स्वीकारावी. वर्गणीसाठी कोणावरही दबाव आणणे किंवा धमकी देणे चुकीचे आहे. नागरिकांनी दिलेल्या पैशांचा योग्य आणि पारदर्शक वापर झाला पाहिजे. मंडळांनी जमा झालेली वर्गणी आणि झालेला खर्च याचा हिशेब नागरिकांसमोर मांडला तर गणेश मंडळांवरील विश्वास अधिक दृढ होईल. गणेशोत्सवाच्या नावाखाली आर्थिक गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी पारदर्शकता अत्यंत आवश्यक आहे.

गणेशोत्सवातील अनावश्यक रोषणाई आणि भव्य सजावट यावरही विचार करण्याची गरज आहे. आकर्षक सजावट करण्याच्या स्पर्धेत मोठ्या प्रमाणावर वीज खर्च केली जाते. सजावट साधी, सुंदर आणि पर्यावरणपूरक असली तरी उत्सवाचे सौंदर्य कमी होत नाही. उलट साधेपणातही सौंदर्य आणि संस्कार दडलेले असतात. विजेची बचत करून तो पैसा समाजोपयोगी कामांसाठी वापरला तर गणेशोत्सवाचा सामाजिक अर्थ अधिक व्यापक होईल.काही ठिकाणी गणेश मंडळांमध्ये 'आमचा गणपती मोठा', 'आमची सजावट मोठी', 'आमचा कार्यक्रम मोठा' अशी स्पर्धा निर्माण होते. मंडळांचे मार्केटिंग करण्यासाठी जाहिराती, अनावश्यक प्रसिद्धी आणि सेलिब्रिटींच्या उपस्थितीला अवास्तव महत्त्व दिले जाते. प्रसिद्धी मिळविण्याच्या या स्पर्धेतून मंडळांमध्ये मतभेद निर्माण होऊ नयेत. गणरायाच्या उत्सवातून समाजात एकोपा वाढला पाहिजे; तेढ निर्माण होता कामा नये.

गणेशोत्सव हा समाजाला जोडणारा उत्सव आहे. त्यामुळे या दहा दिवसांत गणेश मंडळांनी समाजोपयोगी आणि विधायक उपक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्ती अभियान, वाहतूक जनजागृती, व्यसनमुक्ती जनजागृती, महिला आणि बालसुरक्षेविषयी प्रबोधन अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करता येऊ शकते. आपल्या समाजात आजही अनेक कुटुंबे आर्थिक अडचणींचा सामना करीत आहेत. अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, पुस्तके, वह्या, शिष्यवृत्ती किंवा इतर आवश्यक मदत देण्याचा उपक्रम गणेश मंडळे राबवू शकतात. गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावणे, हा गणरायाला वाहिलेला खरा नैवेद्य ठरेल.

पूर, दुष्काळ, अतिवृष्टी किंवा इतर नैसर्गिक आपत्तीच्या काळात गणेश मंडळांनी मदतीसाठी पुढे यावे. गरजू कुटुंबांना अन्नधान्य, कपडे आणि आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे, आपत्तीग्रस्तांना आर्थिक मदत करणे, हा सामाजिक बांधिलकीचा उत्तम आदर्श ठरू शकतो. अनाथाश्रम, वृद्धाश्रम आणि गरजू व्यक्तींना मदत करून गणेशोत्सवाला माणुसकीची जोड देता येईल.

गणेश मंडळांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करावे. गीतगायन, वक्तृत्व, निबंधलेखन, चित्रकला, हस्ताक्षर, प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रदर्शन, कथाकथन अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला व्यासपीठ मिळू शकते. गणेश ही बुद्धीची आणि ज्ञानाची देवता मानली जाते. त्यामुळे गणेशोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविणे आणि ज्ञानाची गोडी निर्माण करणे हे अत्यंत विधायक कार्य ठरू शकते. गणेशोत्सवाच्या काळात समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याची संधीही मिळते. जात, धर्म, भाषा, आर्थिक परिस्थिती यांचे भेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येऊन उत्सव साजरा केला पाहिजे. समाजात बंधुभाव, सहकार्य आणि परस्पर सन्मान वाढविणे हीच सार्वजनिक गणेशोत्सवाची खरी ताकद आहे.

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवामागे केवळ धार्मिक भावना नव्हती, तर समाजजागृती आणि संघटनशक्ती निर्माण करण्याचा व्यापक विचार होता. आज स्वातंत्र्य मिळून अनेक दशके झाली असली तरी समाजासमोर अनेक नवीन आव्हाने आहेत. अज्ञान, बेरोजगारी, व्यसनाधीनता, पर्यावरणाचा ऱ्हास, सामाजिक विषमता, डिजिटल गैरवापर आणि वाढते प्रदूषण यांसारख्या प्रश्नांवर जनजागृती करण्यासाठी गणेश मंडळे प्रभावी माध्यम बनू शकतात.

गणरायाच्या चरणी प्रार्थना करताना समाजासाठी आपण काय करू शकतो, याचाही विचार केला पाहिजे. गणेशोत्सवातील खर्चाचा काही भाग विधायक कामांसाठी राखून ठेवला, तर त्यातून अनेक गरजूंच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणता येईल. उत्सव संपल्यानंतर मंडप आणि सजावट हटविली जाते; परंतु त्या दहा दिवसांत केलेले समाजोपयोगी कार्य लोकांच्या मनात दीर्घकाळ टिकते.

गणेशोत्सव हा आनंदाचा, भक्तीचा आणि उत्साहाचा उत्सव आहे. तो उत्साह निश्चितच कायम राहिला पाहिजे; मात्र त्याला शिस्त, संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणाची जोड मिळाली पाहिजे. दुसऱ्यांना त्रास न देता, पर्यावरणाचे रक्षण करत, कायद्याचे पालन करत आणि समाजाच्या हितासाठी विधायक उपक्रम राबवत गणेशोत्सव साजरा केला तर त्याचे पावित्र्य निश्चितच टिकून राहील. मोठ्या मूर्तीपेक्षा मोठी भक्ती, मोठ्या आवाजापेक्षा मोठा सामाजिक संदेश आणि भव्य सजावटीपेक्षा मोठे समाजकार्य महत्त्वाचे आहे. लोकमान्य टिळकांनी दाखवून दिलेल्या मार्गावर चालत गणेशोत्सवाला पुन्हा सामाजिक प्रबोधनाचे आणि समाजसेवेचे स्वरूप देणे हीच गणरायाला खरी मानवंदना ठरेल. गणपती बाप्पा मोरया म्हणताना प्रत्येकाच्या मनात एकच संकल्प असावा'गणेशोत्सव भक्तीचा असावा, पर्यावरणपूरक असावा आणि समाजासाठी विधायक कार्य करणारा असावा.' अशा उत्सवातूनच गणरायाचे आगमन खऱ्या अर्थाने मंगलमय होईल आणि लोकमान्य टिळकांचा सार्वजनिक गणेशोत्सवामागील मूळ उद्देशही सार्थकी लागेल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# गॅजेट्सच्या विळख्यात हरवत चाललीय आपली स्मरणशक्ती!

आजचे युग तंत्रज्ञानाचे आहे. स्मार्टफोन, इंटरनेट, गुगल, जीपीएस आणि विविध डिजिटल ॲप्सनी आपले दैनंदिन जीवन कमालीचे सोपे केले आहे. काही सेकंदांत जगभरातील माहिती आपल्या हातात येते, क्षणात कोणाशीही संपर्क साधता येतो आणि अनोळखी रस्ताही जीपीएसच्या मदतीने सहज सापडतो. मात्र, या सुविधांची एक वेगळी किंमतही आपण मोजत आहोत. प्रत्येक छोट्या गोष्टीसाठी तंत्रज्ञानावर अवलंबून राहण्याची सवय लागल्याने आपण स्वतःच्या मेंदूचा वापर कमी तर करत नाही ना, हा प्रश्न आता गांभीर्याने विचारण्याची वेळ आली आहे. पूर्वी एखाद्या व्यक्तीचा फोन नंबर, घराचा पत्ता, महत्त्वाच्या तारखा किंवा एखादा रस्ता सहज लक्षात राहत असे. आज मात्र हीच माहिती आपल्या मेंदूत साठवण्याऐवजी आपण ती स्मार्टफोनच्या 'कॉन्टॅक्ट', 'कॅलेंडर' किंवा 'मॅप'मध्ये जतन करून ठेवतो. माहिती लक्षात ठेवण्यापेक्षा ती कुठे शोधायची, एवढेच लक्षात ठेवण्याची प्रवृत्ती वाढत आहे. यालाच मानसशास्त्रीय चर्चेत 'डिजिटल ॲम्नेशिया' किंवा 'गुगल इफेक्ट' असे संबोधले जाते.

आपल्याला एखादी माहिती इंटरनेटवर कधीही सहज मिळू शकते, याची खात्री असल्यामुळे ती माहिती स्वतःच्या स्मरणात ठेवण्याची गरज आपल्याला वाटत नाही. परिणामी, माहिती लक्षात ठेवण्याऐवजी ती माहिती कुठे आणि कशी शोधायची, यावर आपला भर राहतो. उदाहरण अगदी साधे आहे. एखाद्या व्यक्तीचा फोन नंबर पूर्वी आपण पाठ करून ठेवत होतो. आता तो नंबर एकदा सेव्ह केला की पुन्हा लक्षात ठेवण्याची गरजच भासत नाही. एखाद्या प्रश्नाचे उत्तर माहीत नसले की विचार करण्याआधीच 'गुगल'वर शोध घेण्याची सवय लागली आहे. तंत्रज्ञानामुळे स्मरणशक्ती अक्षरशः नष्ट होते, असे सरसकट म्हणणे योग्य ठरणार नाही. मात्र, सतत बाह्य डिजिटल साधनांवर अवलंबून राहिल्याने माहिती लक्षात ठेवण्याची आणि आठवण्याची आपली सवय कमी होऊ शकते. त्यामुळे मेंदूला नियमितपणे



विचार, स्मरण आणि समस्या सोडवण्याचे आव्हान देणे महत्त्वाचे ठरते.

कधीकाळी लोकांना अनेक फोन नंबर, पत्ते, कविता, श्लोक, म्हणी आणि महत्त्वाच्या घटना सहज आठवत असत. आज स्मार्टफोनने या अनेक गोष्टींची जबाबदारी स्वतःकडे घेतली आहे. वाढदिवस लक्षात ठेवण्यासाठी रिमाइंडर, बिल भरण्यासाठी अलर्ट, फोन नंबरसाठी कॉन्टॅक्ट लिस्ट, कामांसाठी नोट्स आणि रस्ता शोधण्यासाठी जीपीएसआपल्या दैनंदिन आयुष्यातील अनेक गोष्टींचे स्मरण आता उपकरणे करून देतात. यामुळे आपला वेळ आणि श्रम वाचतात, हे निश्चित. पण प्रत्येक वेळी मेंदूला आठवण्याची संधीच दिली नाही, तर नैसर्गिक स्मरणक्षमता वापरण्याची सवय कमी होऊ शकते. म्हणूनच स्मार्टफोनचा वापर सहाय्यक म्हणून करावा, पर्याय म्हणून नव्हे.

आपल्या शरीराला तंदुरुस्त ठेवण्यासाठी व्यायाम आवश्यक असतो. त्याचप्रमाणे मेंदूलाही सतत सक्रिय ठेवणे गरजेचे आहे. वाचन, लेखन, पाठांतर, गणिती कोडी सोडवणे, एखादी गोष्ट आठवून सांगणे, नवीन कौशल्य शिकणे अशा विविध कृती मेंदूला सक्रिय ठेवतात. मानवी मेंदूची एक महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे न्यूरोप्लास्टिसिटी अनुभव आणि सवयींनुसार मेंदूच्या कार्यपद्धतीत बदल घडण्याची क्षमता. त्यामुळे आपण कोणत्या गोष्टी सातत्याने करतो, याला महत्त्व आहे. प्रत्येक छोट्या कामासाठी डिजिटल मदत घेण्याऐवजी काही गोष्टी स्वतः लक्षात ठेवण्याचा आणि विचार करून सोडवण्याचा प्रयत्न केल्यास मेंदूला आवश्यक मानसिक व्यायाम मिळतो.

पूर्वी अनोळखी ठिकाणी जाताना लोक रस्त्यावरील खुणा, चौक, झाडे, इमारती, दिशा आणि परिसर यांचे निरीक्षण करून मार्ग लक्षात ठेवत. आज जीपीएस आणि गुगल मॅप्समुळे हा सारा मानसिक प्रयत्न मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. स्क्रीनवर दिसणाऱ्या बाणाचा सतत पाठलाग करण्याऐवजी अधूनमधून स्वतः रस्ता, दिशा आणि परिसर समजून घेण्याचा प्रयत्न केला तर मेंदूला अधिक सक्रियपणे काम करावे लागते. दिशा आणि स्थानिक माहितीशी संबंधित मेंदूतील भागांना अशा अनुभवांचा उपयोग होतो.

डिजिटल जगाशी सर्वाधिक जवळीक असलेली पिढी म्हणजे आजची मुले. अभ्यास, मनोरंजन, खेळ, संवाद आणि माहितीसगळ्यांसाठी स्क्रीन सहज उपलब्ध आहे. पाढे पाठ करण्याऐवजी कॅल्क्युलेटर, शब्दांचे स्पेलिंग तपासण्यासाठी ऑटोकरेक्ट, प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी इंटरनेट आणि मोकळ्या वेळेसाठी व्हिडिओ किंवा गेम्सप्रत्येक गोष्टीसाठी डिजिटल मदत मिळत असल्याने मुलांना स्वतः विचार करण्याची आणि आठवण्याची संधी कमी मिळू शकते. याशिवाय मैदानी खेळ, पुस्तकांचे वाचन, मित्रांशी प्रत्यक्ष संवाद आणि कल्पनाशक्तीला वाव देणाऱ्या कृती यांचे महत्त्वही कमी होता कामा नये. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी स्क्रीन आणि प्रत्यक्ष अनुभव यांच्यात संतुलन आवश्यक आहे.

गॅजेट्सचा पूर्ण त्याग करणे आजच्या काळात शक्यही नाही आणि आवश्यकही नाही. प्रश्न तंत्रज्ञानाचा नसून त्याच्या वापराच्या पद्धतीचा आहे. स्मरणशक्ती सक्रिय ठेवण्यासाठी काही छोट्या सवयी अंगीकारता येतील आवश्यक फोन नंबर, महत्त्वाच्या तारखा आणि काही पत्ते पाठ करण्याचा प्रयत्न करा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर लगेच इंटरनेटवर शोधण्याआधी काही क्षण स्वतः विचार करा. शक्य असेल तेव्हा जीपीएसशिवाय परिचित मार्ग लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करा. दररोज काही काळ 'स्क्रीन-फ्री' ठेवा. मोबाईलऐवजी कागदी पुस्तके वाचण्याची सवय लावा. पाढे, कविता, श्लोक किंवा महत्त्वाची माहिती अधूनमधून पाठ करा. मुलांना मैदानी खेळ, चित्रकला, वाचन, कोडी आणि स्मरणशक्तीचे खेळ यासाठी वेळ द्या. एखादा सुंदर क्षण लगेच कॅमेऱ्यात कैद करण्याआधी तो काही क्षण मनापासून अनुभवण्याचा प्रयत्न करा.

तंत्रज्ञान हे माणसासाठी वरदान आहे. त्याने जग जवळ आणले, माहिती सहज उपलब्ध करून दिली आणि अनेक कामे क्षणार्धात पूर्ण करण्याची ताकद दिली. पण सुविधा मिळाल्यामुळे आपल्या नैसर्गिक क्षमतांचा वापरच बंद झाला, तर हीच सुविधा आपल्यासाठी अवलंबित्वाचे कारण ठरू शकते. स्मार्टफोन आपल्या हातात असावा; आपल्या सवयी आणि स्मरणशक्तीचा ताबा त्याच्या हातात नसावा. म्हणूनच प्रत्येक वेळी 'गुगल'कडे धाव घेण्याआधी स्वतःच्या मेंदूला एक संधी द्या. प्रत्येक रस्ता 'मॅप'वर शोधण्याआधी तो स्वतः लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करा. आणि प्रत्येक आठवणीसाठी कॅमेऱ्याचा आधार घेण्याआधी तो क्षण मनात साठवा. कारण शेवटी, तंत्रज्ञानाने आपले जीवन सोपे करावे; आपली विचारशक्ती आणि स्मरणशक्ती आपल्यापासून हिरावून घेऊ नये.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि. सांगली

# सुखी जीवनासाठी शरीराबरोबरच मनानेही मजबूत होणे गरजेचे

सकाळी-सकाळी एका अनोळखी मुलीचा कॉल आला. ती माझ्या एका मित्राची मैत्रिण होती. माझे लेख ती मित्राच्या स्टेट्सवर नेहमी वाचते आणि त्यातून तिला प्रेरणा मिळते अशी ती सांगत होती. तिचे शब्द ऐकून समाधान वाटले. मी तिला पुढे विचारले, बोला सकाळी-सकाळी कसा काय कॉल केला? त्यावर त्या मुलीने सांगितले, दादा, माझ्या खूप जवळच्या काही मैत्रिणी माझ्यापासून काही कारणाने दूर झाल्या आहेत. यावर मी काय करू, काही समजत नाही आहे. मी यंदा अंतिम वर्षाला असून मैत्रिणी दूर झाल्यामुळे माझ्या अभ्यासावर खूप परिणाम होत आहे. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून मी खूप तणावात आहे. कृपया मला मदत करावी.

विचार केला तर ही काही मोठी समस्या नव्हती. कारण प्रत्येकासोबत कधी ना कधी असा प्रसंग घडतोच. पण तिच्या बाजूने बघितले असता ही समस्या वाटते तितकी सोपी पण नव्हती. कारण माणसाला माणसाचे लागलेले व्यसन फार भयंकर



असते आणि माणसाचे लागलेले व्यसन मेडिकलमधील कोणत्याही औषधीने सुटत नाही हेही तितकेच खरे. त्यासाठी माणूसच हवा असतो. पण बऱ्याचदा हा माणूस मिळणे कठीण होऊन जाते आणि आपण एकटे पडून जातो. ज्यावेळी आपण एकटे पडतो तेव्हा मात्र मनाची अवस्था फार वाईट होते. कारण मुळात एकटे राहण्याची सवय आपल्याला नसते. म्हणून आपण तिथेच गुंतून राहतो.

माहीत आहे का? आपल्याला फरक तेव्हाच पडतो जेव्हा समोरच्या व्यक्तीमध्ये आपला जीव अडकलेला असतो. त्यामुळे आपल्या आयुष्यात कुणाच्या जाण्याचा-येण्याचा जर आपल्याला फरक पडत असेल तर आपण मनातून त्या व्यक्तीला आपले मानले होते याचा स्वतःच अभिमान बाळगावा. कारण जीव नसलेल्या गोष्टीचा माणसाला कधीच फरक पडत नसतो. म्हणून आपण आपल्या बाजूने भक्कमपणे नातं निभावलं तरीही समोरची व्यक्ती आपल्यापासून दूर होत असेल तर त्यात आपला दोष नाही हे आधी स्वतःला समजावून सांगणे आवश्यक आहे. त्यामुळे कुणी आपल्याला सोडून जात असेल तर हसत-हसत अशा लोकांना निरोप देता आला पाहिजे.

हसत हसत निरोप देता आला तर अनेक प्रश्न आपोआप सुटत जातात. आपला मार्ग मोकळा होतो. आपण आपल्या वाटेला आणि समोरचा व्यक्ती त्याच्या वाटेला लागतो. त्यामुळे कोणत्याही गोष्टीत जास्त वेळ गुंतून राहू नका. कळत नकळतपणे घडलेल्या गोष्टीचा मोठ्या मनाने स्वीकार करावा आणि जोमाने पुढच्या प्रवासाच्या तयारीला लागावे. कारण आयुष्यातील अपघात कधी सांगून होत नाही. त्यामुळे कधीही आपल्यासोबत काहीही होऊ शकते. म्हणून आपल्या मनाची तयारी पक्की असली पाहिजे. त्यामुळे आज शरीराने मजबूत होण्यापेक्षा मनाने मजबूत होणे गरजेचे झाले आहे. कारण मेडिकलच्या औषधीने शरीराची कमजोरी दूर करता येते, मनाची कमजोरी नाही.

आपली आपली म्हणणारी माणसे जेव्हा आपल्यापासून दुरावतात तेव्हा आपल्याला त्रास होतोच. पण एक लक्षात ठेवा. माणसे जशी दूर होतात, तशी जवळही येतात. फक्त आपण निस्वार्थी असलो पाहिजे. कारण आपण निस्वार्थी, प्रामाणिक असू तर आपली येणारी वेळ त्या सर्व प्रश्नांची उत्तरे आपोआप देते. त्यामुळे एक अपघात झाला म्हणून आपल्या आयुष्याचा सुंदर प्रवास कधी थांबवायचा नाही. झालेल्या गोष्टी तिथेच सोडून देऊन माणसाने नेहमी चालत राहिले पाहिजे. कारण चालत राहणे हे आपल्या जिवंतपणाचे लक्षण आहे. म्हणून आपल्या वाट्याला जे येते त्याचा स्वीकार करून नेहमी आपण पुढे जात राहिले पाहिजे.

**- सुरज पी. दहागावकर**
चंद्रपूर
मो. ८६९८६१५८४८

# शेतकरी राजा पावसाच्या प्रतीक्षेत; १५ ते २० दिवसांपासून पावसाची दडी

## सोयाबीनसह अन्य पिकांवर संकटाचे सावट

**शंकरनगर (प्रतिनिधी)** – परिसरात गेल्या १५ ते २० दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकरीवर्ग हवालदिल झाला आहे. गेल्या वर्षी पावसाने एकीकडे अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले होते, तर आता पावसाने पाठ फिरवल्याने उभ्या पिकांवर संकट ओढवले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हातातोंडाशी आलेला घास निसर्ग हिरावून घेणार काय, या चिंतेने शेतकरी ग्रासला आहे.

हंगामाच्या सुरुवातीला यावर्षी तुलनेने चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी घाईगडबडीत पेरण्या आटोपून घेतल्या. परिसरात मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची पेरणी करण्यात आली असून, त्यासोबत मूग, उडीद, कापूस, तूर आदी पिकांचाही मोठ्या प्रमाणात समावेश आहे.

मात्र, यावर्षी पावसाने टोकाची भूमिका घेतल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीच्या जवळपास दोन महिन्यांत तुरळक पडणाऱ्या पावसामुळे अनेक ठिकाणची पिके पिवळी पडून वाळू लागली. विशेषतः मूग, तूर तसेच सखल भागातील सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

पाण्याचा योग्य निचरा होणाऱ्या जमिनीतील पिके काही प्रमाणात तग धरून असली, तरी सोयाबीन पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. रोगराईपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना आतापर्यंत तीन ते चार वेळा महागडी औषधे खरेदी करून फवारणी करावी लागली आहे. त्यामुळे आधीच वाढलेल्या उत्पादन खर्चाने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

सध्या सोयाबीन पिकाच्या शेंगा भरण्याचा महत्त्वाचा काळ सुरू असतानाच पावसाने दडी मारली आहे. शेतकऱ्यांचे बहुतांश आर्थिक गणित सोयाबीनच्या उत्पादनावर अवलंबून असल्याने पावसाअभावी शेंगा भरण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

अतिपाऊस झाला तरी पिकांचे नुकसान आणि पाऊस कमी झाला तरी नुकसान, अशा दुहेरी संकटात शेतकरी भरडला जात आहे. गेल्या १५ ते २० दिवसांपासून पावसाने पाठ फिरवल्याने परिसरातील पिकांना सध्या पावसाची नितांत गरज आहे. त्यामुळे बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत असून, आकाशाकडे आशेने नजर लावून बसला आहे.

पाऊस पडू दे, पिकांना जीवदान मिळू दे, असे साकडे शेतकरी वरुणराजाकडे घालत आहे. आता येत्या काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाला, तरच हंगामातील पिकांना नवसंजीवनी मिळण्याची आशा शेतकरीवर्गाला आहे.

# मराठवाड्यात कृत्रिम पावसाचा प्रयोग करावा –प्रल्हाद इंगोले



**नांदेड (प्रतिनिधी)**– अर्धा पावसाळा होऊन गेला तरीही समाधानकारक पाऊस न झाल्याने हातातोंडाशी आलेला शेतकऱ्यांचा घास वाया घालण्याची भीती निर्माण झाली आहे. फूल, शेंगा अवस्थेत असलेली पिके वाळून जाताना पाहून शेतकरी कमालीचा हवालदिल झाला असल्याने शासनाने मराठवाड्यात कृत्रिम पावसाचा प्रयोग करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी सेनेचे प्रदेश सरचिटणीस प्रल्हाद इंगोले यांनी केली आहे.

राज्याच्या तुलनेत मराठवाड्यात अत्यंत कमी पाऊस झाला आहे. अर्धा पावसाळा होत आला तरीही एकाही नदी–नाल्याला पूर आला नाही. अनेक विहिरी अद्याप कोरड्याच आहेत. भविष्यात पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्यांचाही मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे शासनाने तत्काळ मराठवाड्यात कृत्रिम पावसाचे प्रयोग करावेत जेणेकरून ज्या भागात दगड आले त्या भागात तरी पाऊस पडेल व काहीअंशी शेतकऱ्यांना दिलासा मिळेल.

मूग, उडीद, सोयाबीन, ज्वारी, कापूस तूर आदी खरिपाची पिके पूर्णतः वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. हळद, केळी, ऊस, पपई यांचीही वाढ पूर्णतः खुंटली असून, भविष्यात अन्नधान्याचाही मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे शासनाने विनाविलंब मराठवाड्यात तातडीने कृत्रिम पावसाचे प्रयोग करावेत अशी मागणी शिवसेना प्रणीत शेतकरी सेनेचे प्रदेश सरचिटणीस तथा शेतकरी नेते प्रल्हाद इंगोले यांनी केली आहे.

# भोकरमध्ये इनामी जमीन घोटाळा प्रकरण पेटले; भूमाफीयांकडून ब्लॅकमेलिंग होत असल्याची तक्रार



**भोकर (प्रतिनिधी)**– येथील इनामी जमीन गट नंबर २६२, १९५१ शासन आदेशान्वये गावठाणमध्ये रूपांतरित करण्यात आली असताना सदरील जमीन सातबारावर गावठाणची नोंद न केल्यामुळे भूमाफियांकडून ब्लॅकमेलिंग होत असल्याची तक्रार येथील नागरिकांनी भोकरचे तहसीलदार व पोलीस निरीक्षकांकडे केली आहे.

भोकरमध्ये गेल्या अनेक वर्षापासून इनामी जमीन खरेदी विक्रीचा प्रकार चालू आहे. गेल्या ६० ते ७० वर्षापासून अनेक नागरिकांनी जमिनी खरेदी करून पक्की घरे बांधलेली आहेत. यामध्ये भोकरचे तहसील कार्यालयही आहे. अनेक नागरिकांकडे कमर्शियल एन.ए.पण झाले आहे. शासकीय नियमानुसार पी. आर.कार्ड असलेल्या गट नंबर सातबारा रद्द करण्याचा शासकीय नियम आहे. पण गट नंबर २६२ चा सातबारा काही कारणास्तव रद्द झालेला नाही. सातबारावर गावठाणची नोंद घ्यावी, नोंद न झाल्यामुळे कांही समाजकंटक भूमाफियांकडून जमीन– धारकांना पैशाची मागणी करून वारंवार त्रास देत ब्लॅकमेलिंग करीत आहेत. या त्रासाला कंटाळून परवाच व्यंकटी भुरेवार या व्यापाऱ्यांनी आत्महत्या केली आहे.नेहमी मानसिक व आर्थिक त्रास देऊन ब्लॅकमेलिंग करणाऱ्यांमध्ये डॉ. फिरोज इनामदार, अफरोज खान जब्बार खान ही व्यक्ती असल्याचे निवेदनात नमुद केले आहे.

अर्जाची दखल घेऊन गट नंबर २६२ चा सातबारा रद्द करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली असून, या निवेदनावर राधेश्याम असावा, अब्दुल जब्बार अब्दुल अजिज, अब्दुल मुबीन अ. वाहेद, अ. खादरी, गिरमाजी बुद्धेवाड, डॉ. बालाजी बिलरवार, अ. खादरी, दिनेश तिवारी, डॉ. उत्तम जाधव, डॉ. सचिन हुलसुरे, डॉ. बी. आर. जाधव, संतोष आलेवाड, सुभाष घंटलवार, अ. खालिद मौलाना आदींसह ५० ते ६० प्लॉटधारक नागरिकाच्या स्वाक्षऱ्या आहेत.




**नांदेड** –राज्यातील कंत्राटदार यांचे प्रलंबीत देयके न मिळाल्याने आत्महत्या केलेले कंत्राटदार गजानन देवकते नवीमुंबई, दयानंद हुल्ले उदगीर जि. लातूर यांच्या आत्महत्यासंदर्भात शासनाने संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करत चौकशी समिती नेमावी या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष बालाजी नाईक, सचिव मनोज बारगळ, उपाध्यक्ष शेख नजील, बापू कदम, जिल्हा कार्यकारिणी सदस्य चंद्रमुनी सावंत, विकास बडेवार, भीमराव अंबुरे, नागोराव अडकीने, ज्ञानेश्वर दामेकर, एम. एस. कदम, साईनाथ जाधव आदी उपस्थित होते. (छाया : सचिन डोंगळीकर)

# येलो मॉर्निंगवॉक ग्रुप नांदेडतर्फे शिक्षकांचा सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)**– येलो मॉर्निंगवॉक ग्रुप नांदेडच्यावतीने नमस्कार चौकातील राजयोग हॉटेल येथे भारताचे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी शिक्षक दिनाच्या निमित्ताने समूहातील शिक्षकांचा सत्कार करून त्यांना शिक्षकदिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

आपल्या देशातील शिक्षक आपल्या विद्यादानातून डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, प्राध्यापक, वैज्ञानिक घडवतात. शिक्षकांना शिक्षकांचेच ज्ञानदानाचे काम करू द्यावे, अशी भावना व्यक्त करून शासनाने शिक्षकांवर अतिरिक्त कामे लादू नयेत, अशी मागणी येलो मॉर्निंगवॉक ग्रुपचे ज्येष्ठ सदस्य बालाजी लाडेकर यांनी केली.

यावेळी विलास रोकमवार, दिलीप निलावार, प्रल्हाद पाटील, रंगनाथ राठोड, राजेश चक्रावार, गबाळे, रामराव हेंगडे यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास समूहाचे अध्यक्ष सुरेश वाघमारे, सचिव गजानन सावंत, किशनराव राकुरे, सहायक उपायुक्त विठ्ठल तिडके, दीपक खंबाळकर, प्रकाश



राठोड, धनमुद्रा बँकेचे मॅनेजर मनोज लंगडे, पुरुषोत्तम टाले, भास्कर कंकाळ पाटील, राजयोग हॉटेलचे संचालक विठ्ठल पाटील पवार यांच्यासह अनेक सदस्यांची उपस्थिती होती.

येलो मॉर्निंगवॉक ग्रुपच्यावतीने विविध सामाजिक उपक्रम यापुढे नेहमीच राबविण्यात येतील असे सांगून सचिव गजानन सावंत यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यक्ष सुरेश वाघमारे यांनी केले.

# हमाल–माथाडी कामगारांचे २८ सप्टेंबरपासून विविध मागण्यांसाठी पुण्यात धरणे आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)**– हमाल–मापाडी कामगारांच्या रोजगारावर गदा आणण्याच्या राज्य सरकारच्या धोरणाविरोधात येत्या २८ सप्टेंबरपासून पुण्यातील कौन्सिल हॉलसमोर निदर्शने करून बेमुदत धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या संदर्भात नांदेड हमाल–मापाडी हातगाडा संघटनेच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांची भेट घेऊन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री तसेच कामगारमंत्र्यांना निवेदन पाठवण्यात आले.

राज्यातील शासकीय धान्य गोदामांमध्ये वर्षानुवर्षे कष्ट करून शासनाची धान्य वितरण व्यवस्था सुरळीत ठेवणाऱ्या हजारो हमाल–माथाडी कामगारांच्या रोजगारावर गदा आणण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा संघटनेने दिला आहे. कामगारांचा रोजगार आणि त्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह वाचवण्यासाठी हे राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून सोम वारी जिल्हा प्रशासनामार्फत शासनाला निवेदने पाठवण्यात आली.

निवेदन देताना संघटनेचे अध्यक्ष रावसाहेब कांबळे, उपाध्यक्ष शिवाजी दराडे, सचिव चंद्रकांत कोलते, उपसचिव आनंद कोकरे, कोषाध्यक्ष गंगाधर नरवाडे यांच्यासह सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र अनुसूचित जमाती विकासाची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हाधिकारी, नांदेड यांच्यामार्फत महाराष्ट्र शासनास महाराष्ट्र अनुचित जमाती प्रकरणाच्या मागणीचे निवेदन आदिवासी कोळी महादेव मराठवाडा विभागाच्या वतीने सादर करण्यात आले.

अनुसूचित जमातीच्या मागील अनेक दशकांतील जनगणना, राजकीय प्रतिनिधित्व, शासकीय आर्थिक तरतूद व प्रत्यक्ष खर्च, शिक्षण, शिष्यवृत्ती, आश्रमशाळा, वसतिगृह, रोजगार, जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र तसेच न्यायालयीन परिणाम याबाबत अधिकृत व पारदर्शक माहिती जनतेसमोर यावी, हा या मागणीचा मुख्य उद्देश आहे.

विशेषतः अनुसूचित जमातींच्या विविध घटकांची जनगणनेतील लोकसंख्या, त्यानुसार शासनाच्या योजनांमध्ये झालेली तरतूद व प्रत्यक्ष लाभार्थी याबाबत जमातनिहाय व जिल्हानिहाय अधिकृत माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी



करण्यात आली आहे.

जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या अडचणी, त्याविरुद्ध झालेल्या न्यायालयीन प्रकरणांचे परिणाम आणि त्या प्रक्रियेमुळे शिक्षण, रोजगार, शिष्यवृत्ती, वसतिगृह किंवा इतर शासकीय लाभांवर परिणाम झाल्याच्या तक्रारींचाही अधिकृत आकडेवारीच्या आधारे वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यात यावा, अशी मागणी आहे.

आज सादर केलेल्या निवेदनावर महाराष्ट्र शासनाने १५ दिवसांच्या आत श्वेतपत्रिका तयार करण्याची अधिकृत प्रक्रिया सुरु करुन त्याबाबत लेखी माहिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शासानाकडून या मागणीवर ठोस व वेळबद्ध कार्यवाही सुरू न झाल्यास, आवश्यक प्रशासनिक परवानगी/पूर्वसूचना व लागू कायद्याचे पालन करून दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी नांदेड येथे शांततामय, अहिंसक व घटनात्मक सत्याग्रह धरणे आंदोलन करण्यात येईल.

हे अभियान कोणत्याही व्यक्ती, अधिकारी, राजकीय पक्ष, जात किंवा धर्माविरुद्ध नसून पारदर्शकता, सामाजिक न्याय, उत्तरदायित्व आणि अनुसूचित जमातीच्या घटनात्मक हक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीची सार्वजनिक हिताची मागणी आहे. जनगणना ते प्रत्यक्ष लाभ संपूर्ण अधिकृत माहिती जनतेसमोर आणा आणि महाराष्ट्र अनुसूचित जमाती विकासाची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करा आदी मागण्यांचा समावेश आहे.

यावेळी आदिवासी कोळी महादेव मराठवाडा विभागाचे अध्यक्ष नागनाथ घिसेवाड, व्यंकटराव मुदिराज, शशिकांत भुसेवाड, राजकुमार गादगे, आनंदा रेजितवाड, विठ्ठलराव पंजेवाड, माधवराव रेडेवाड, दादाराव कोठेवाड, विश्वनाथ चंदलवाड, राजू डोबुलवाड, जगजीवन सुद्धेवाड, नागनाथ जंगेपल्लेवाड, शंकर तम्मनवाड, राजू पिंगलवाड, प्रभाकर केंगल, प्रकाश अंबेराय आदी जमात बांधवांची उपस्थिती होती.

# गोदावरीच्या तीरावर गुरू चरित्राचा भक्तिमय जागर

## राहेर येथे १० ते १२ सप्टेंबरदरम्यान तीन दिवसीय पारायण सोहळा; भाविकांना सहभागी होण्याचे आवाहन

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – गोदावरीच्या पावन तीरावर वसलेल्या श्री तीर्थक्षेत्र राहेर येथील जन्मभूमी देवस्थानात अध्यात्मिक आणि भक्तिमय वातावरणात तीन दिवसीय श्री गुरूचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अष्टकौशल्य सन्मानित श्री.श्री. १००८ सद्गुरू समर्थ नारायणगीर गुरु बाळगीर श्री सद्गुरू समर्थ बाळगीर महाराज यांच्या संकल्पनेतून दर अमावस्येला आयोजित करण्यात येणाऱ्या या धार्मिक उपक्रमाचे आयोजन दि. १०, ११ आणि १२ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे.

श्री गुरूचरित्राच्या सामूहिक पारायणातून भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा जागर घडविणाऱ्या या सोहळ्याची तयारी देवस्थान परिसरात करण्यात आली आहे. तीन दिवस चालणाऱ्या या पारायणामुळे राहेरसह परिसरातील भाविकांना सामूहिकरीत्या गुरूचरित्राचे पठण व श्रवण करण्याची संधी मिळणार आहे.

या पारायण सोहळ्यात दररोज सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत गुरूचरित्राचे पठण करण्यात येणार असून, दररोज १७ अध्यायांचे सामूहिक पारायण केले जाणार आहे. गुरूचरित्राच्या माध्यमातून सद्गुरूंच्या उपदेशांचे चिंतन, अध्यात्मिक संस्कार आणि भक्तिभाव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

गोदावरीच्या शांत आणि पवित्र तीरावर असलेल्या जन्मभूमी देवस्थानाच्या परिसरात होणाऱ्या या सामूहिक पारायणामुळे तीनही दिवस भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. परिसरातील तसेच दूरवरून येणाऱ्या भाविकांनी श्रद्धेने सहभागी होऊन या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थानाच्या वतीने करण्यात आले आहे.

या पारायणासाठी सहभागी होणाऱ्या भाविकांनी पांढरे किंवा केशरी वस्त्र परिधान करून यावे, अशी सूचना आयोजकांनी केली आहे. तसेच पारायणासाठी आवश्यक साहित्य व स्वतःचे आसन सोबत आणावे, असेही कळविण्यात आले आहे. दि. १० सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजता सर्व भाविकांनी देवस्थान परिसरात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

श्री गुरूचरित्र पारायणाच्या निमित्ताने श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्म यांचा संगम घडविणाऱ्या या सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि गुरूचरित्राच्या सामूहिक पठणाचा आध्यात्मिक अनुभव घ्यावा, असे आवाहन श्री सद्गुरू समर्थ बाळगीर महाराज जन्मभूमी देवस्थान, श्री तीर्थक्षेत्र राहेर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा -डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड

## यशवंत महाविद्यालय अभ्यास केंद्रात उद्बोधन कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)**– शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला परिस्थितीची अडचण न येता शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात मुक्त विद्यापीठाची भूमिका महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांचा तसेच उपलब्ध शैक्षणिक सेवांचा लाभ घेऊन आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीला दिशा द्यावी, असे प्रतिपादन अर्थशास्त्राचे अभ्यासक डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठांतर्गत यशवंत महाविद्यालय, नांदेड अभ्यास



केंद्राच्या वतीने प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी माजी प्र–कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार दि. ६ सप्टेंबर रोजी उद्बोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. पुपलवाड बोलत होते.

यावेळी त्यांनी मुक्त विद्यापीठाचे विविध अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधा व सेवा, अभ्यासपद्धती तसेच विद्यापीठाचे वेगळेपण याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. मुक्त शिक्षण पद्धतीमुळे नोकरी, व्यवसाय किंवा अन्य जबाबदाऱ्या सांभाळतानाही विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करून शिक्षण पूर्ण करावे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभ्यासकेंद्राचे केंद्र संयोजक डॉ. शिवराज बोकडे होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी, विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे गांभीर्याने पाहून नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन आणि विद्यापीठाच्या विविध सेवांचा योग्य उपयोग करावा, असे आवाहन केले. मुक्त विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विविध संधी उपलब्ध करून देत असून त्याचा विद्यार्थ्यांनी पुरेपूर लाभ घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास डॉ. प्रवीणकुमार सेलूकर व प्रा. शरद वाघमारे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ. संतोष पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्र सहायक भुजंग पुयड व प्रभू पाटील यांनी परिश्रम घेतले. तसेच डॉ. अजय गव्हाणे, संदीप पाटील, गजानन पाटील, जगन्नाथ महामुने यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त सिडकोत महाआरती व दहीहंडी उत्साहात



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्ताने श्रीकृष्ण मंदिर संभाजी चौक सिडको येथे दोन दिवसीय विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले.य यावेळी महाआरती व दहीहंडी सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी मंदिरातील श्रीकृष्ण भगवान मूर्तीची विविध फुलांनी सजावट करून महाआरती, महाअभिषेक, दहीहंडी फोडून भजन करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी नंदकुमार अडकटलवार यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भगवदगीता पारायण, श्रीकृष्ण नामजप, श्रीकृष्ण चालिसा स्तोत्र पारायण प्रवचन असे विविध कार्यक्रम उत्साहात घेण्यात आले.

सोमवार, दि. ४ सप्टेंबर २६ रोजी सकाळी ७ वाजता धुपआरती व प्रसाद, ७ ते ९ श्रीकृष्ण नाम महिमा, स्तोत्र पारायण १० ते ११.३०, श्रीकृष्ण मूर्तीची ५०१ पुष्पांनी महापूजा श्रीमान अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आली.

११.३० कापूर आरती व प्रसाद, दुपारी २ वाजता श्रीकृष्ण नामस्मरण, ४ वाजता श्रीकृष्ण मूर्तीची मिरवणूक सिडको परिसरातील मुख्य मार्गावरील भागातून निघेल. रात्री ११ ते १२ श्रीकृष्ण जन्मोत्सव महाआरती व महाप्रसाद देण्यात आला. मंगळवार, दि. ५ सप्टेंबर रोजी ७ वाजता धुपआरती, दही व लोणीप्रसाद वितरण, ७ ते ९ श्री द्वारकाधी कृष्ण नामजप, ९ ते १० श्रीमद् भागवतगीता पारायण, दर्शनाचार्य डॉ. गोविंदराज शास्त्री धाराशिवकर पैठण यांचे प्रवचन झाले. नंतर गोपालकाला व दहीहंडी, आरती आणि दुपारी १ वाजल्यापासून भोजन महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. या सोहळ्याला भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

यावेळी अनिताताई शेवलीकर, आचार्य श्रीहंसराज महानुभाव आश्रम पुणे, राजश्रीताई जामोदकर यांच्यासह पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी व्यवस्थापक श्रीकृष्ण युवक मंडळ, श्रीकृष्णनगर, संभाजी चौक, सिडको नांदेड व श्रीकृष्ण मंदिर महानुभाव विश्वस्त मंडळ, यांनी सहकार्य केले.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

## पाळीव कुत्र्यासोबत राहिल्याने उच्च रक्तदाबावर नियंत्रण?




**अनेकांना आपल्या पाळीव प्राण्यांसोबत वेळ घालवायला आवडतो. कुत्रा, मांजर किंवा अन्य पाळीव प्राण्यांना काही जण घरातील सदस्याप्रमाणेच जपतात. मात्र, पाळीव प्राण्यांसोबतचा सहवास केवळ भावनिक आनंद देणारा नसून, आरोग्यासाठीही काही प्रमाणात फायदेशीर ठरू शकतो. तज्ज्ञांच्या मते, पाळीव प्राण्यांसोबत वेळ घालवल्याने तणाव कमी होण्यास आणि रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते.**

शहरी जीवनशैलीत गेल्या काही वर्षांत मोठे बदल झाले आहेत. विशेषतः तरुणांचा मोठा वेळ कार्यालयात किंवा घरून काम करताना संगणकासमोर बसून जातो. दीर्घकाळ बसून राहणे, कामाचा वाढता ताण, अपुरी झोप आणि चुकीच्या आहाराच्या सवयी यामुळे मधुमेह तसेच उच्च रक्तदाबाच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे. अशा परिस्थितीत पाळीव प्राण्यांसोबत वेळ घालवण्याची सवय आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकते. काही अभ्यासांनुसार, पाळीव प्राण्यांचा सहवास तणाव कमी करण्यास, शारीरिक हालचाल वाढविण्यास आणि एकटेपणाची भावना कमी करण्यास मदत करू शकतो. या घटकांचा रक्तदाबावरही सकारात्मक परिणाम होऊ शकतो. उच्च रक्तदाबामागील महत्त्वाच्या कारणांपैकी दीर्घकाळ टिकणारा मानसिक तणाव हे एक कारण मानले जाते. व्यक्ती तणावाखाली असताना शरीरात कॉर्टिसोल आणि अ‍ॅड्रेनालिन यांसारख्या संप्रेरकांचे प्रमाण वाढते. परिणामी, रक्तदाब काही काळासाठी वाढू शकतो. राष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या (NIH) माहितीनुसार, पाळीव प्राण्यासोबत खेळणे, त्याला कुरवाळणे किंवा त्याच्यासोबत काही वेळ घालवणे यामुळे शरीरात ऑक्सिटोसिन आणि एंडॉर्फिन यांसारख्या संप्रेरकांच्या निर्मितीस मदत होऊ शकते. त्यामुळे मन शांत होण्यास आणि तणाव कमी होण्यास मदत मिळते. काही अभ्यासांमध्ये पाळीव प्राण्यांसोबत संवाद साधत असताना हृदयाचे ठोके आणि रक्तदाबात किंचित घट झाल्याचे आढळून आले आहे.

### कुत्र्यासोबत चालण्यामुळे वाढते शारीरिक हालचाल

उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमित व्यायाम हा प्रभावी उपायांपैकी एक मानला जातो. कुत्रा पाळणारे अनेक जण त्याला दररोज फिरवण्यासाठी घराबाहेर पडतात. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन शारीरिक हालचाली आपोआप वाढतात. सुमारे ३० मिनिटे वेगाने चालणे हृदयाची कार्यक्षमता सुधारण्यास, वजन नियंत्रणात ठेवण्यास आणि रक्तदाब कमी करण्यास मदत करू शकते. अनेक अभ्यासांनुसार, कुत्रा पाळणाऱ्या व्यक्ती इतरांच्या तुलनेत अधिक सक्रिय जीवनशैली जगण्याची शक्यता असते.



### एकटेपणा आणि चिंता कमी करण्यासही मदत

एकटेपणा आणि चिंता यांचा परिणाम केवळ मानसिक आरोग्यावरच होत नाही, तर या समस्या दीर्घकाळ कायम राहिल्यास रक्तदाब वाढण्याचा धोकाही निर्माण होऊ शकतो. मेंटल हेल्थ अमेरिका या संस्थेच्या माहितीनुसार, पाळीव प्राणी व्यक्तीला भावनिक आधार देऊ शकतात. विशेषतः एकट्याने राहणारे ज्येष्ठ नागरिक किंवा घरून काम करणाऱ्या व्यक्तींसाठी पाळीव प्राण्यांचा सहवास मानसिक स्थैर्य राखण्यास उपयुक्त ठरू शकतो. कुत्रा किंवा मांजरीसोबत नियमित वेळ घालवल्याने सामाजिक जिव्हाळ्याची भावना वाढू शकते आणि एकटेपणाची जाणीव कमी होऊ शकते. मात्र, याचा परिणाम प्रत्येक व्यक्तीमध्ये सारखा असेलच असे नाही. एखाद्या व्यक्तीला गंभीर मानसिक आरोग्याची समस्या असल्यास केवळ पाळीव प्राण्यासोबत वेळ घालवणे हा त्यावरील पुरेसा उपाय मानता येणार नाही.

### केवळ पाळीव प्राणी पाळल्याने रक्तदाब नियंत्रणात येतो का?

याचे उत्तर नाही असेच आहे. केवळ पाळीव प्राणी पाळल्यामुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात येत नाही. पाळीव प्राण्यांचा सहवास हा आरोग्यदायी जीवनशैलीचा एक पूरक भाग म्हणून पाहता येतो; तो उच्च रक्तदाबावरील उपचाराचा पर्याय नाही. अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी डॉक्टरांनी सांगितलेली औषधे नियमितपणे घेणे, आहारातील मिठाचे प्रमाण मर्यादित ठेवणे, आठवड्याला किमान १५० मिनिटे मध्यम स्वरूपाचा व्यायाम करणे, पुरेशी आणि नियमित झोप घेणे, धूम्रपान आणि मद्यपानापासून दूर राहणे, शरीराचे वजन नियंत्रणात ठेवणे, मानसिक तणावाचे योग्य व्यवस्थापन करणे या बाबींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे..



## स्क्रीन टाइम कमी असूनही डोळे का राहतात सतत लाल?

### लहान रक्तवाहिन्या फुटण्यापासून संसर्गापर्यंत जाणून घ्या कारणे...

दिवसभर मोबाइल, संगणक किंवा लॅपटॉपवर काम केल्यानंतर डोळे लाल होणे ही सामान्य बाब आहे. दीर्घकाळ स्क्रीनकडे पाहिल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो आणि त्यामुळे डोळ्यांमध्ये लालसरपणा दिसू शकतो. मात्र, प्रत्येक वेळी डोळे लाल होण्यामागे केवळ स्क्रीनकडे जास्त वेळ पाहणे हेच कारण नसते. डोळ्यांचा कोरडेपणा, ॲलर्जी, धूळ किंवा धुरामुळे होणारी जळजळ, कॉन्टॅक्ट लेन्सचा वापर, डोळ्यांचा संसर्ग आणि डोळ्यांशी संबंधित इतर काही समस्यांमुळेही डोळे लाल होऊ शकतात. दिवसभर लॅपटॉपवर काम केल्यानंतर डोळे लाल आणि थकलेले दिसणे विशेषतः सामान्य आहे. दीर्घकाळ स्क्रीनचा वापर, वातानुकूलित वातावरण, अपुरी झोप आणि सतत डोळ्यांवर ताण येणे यामुळे हा त्रास वाढू शकतो. अनेकदा हा लालसरपणा काही काळापुरता असतो आणि डोळ्यांना पुरेशी विश्रांती दिल्यानंतर कमी होतो. मात्र, डोळ्यांचा लालसरपणा दिवसभर कायम राहत असेल किंवा त्यासोबत वेदना होत असतील, तर त्याकडे केवळ 'डोळ्यांचा थकवा' म्हणून दुर्लक्ष करू नये. काही वेळा हा डोळ्यांच्या आतील समस्येचा संकेतही असू शकतो.

### दिवसभर डोळे लाल का राहतात?

डोळ्यांचा पांढरा भाग लाल होतो, तेव्हा त्यावरील अतिशय लहान रक्तवाहिन्या रुंदावलेल्या असतात किंवा त्या अधिक स्पष्टपणे दिसू लागतात. यामागील एक सामान्य कारण म्हणजे डोळ्यांचा थकवा किंवा डिजिटल आय स्ट्रेन. आपण स्क्रीनकडे एकटक पाहत असताना पापण्यांची उघडझाप कमी होते. त्यामुळे डोळ्यांच्या पृष्ठभागावर असलेला अश्रूंचा थर लवकर सुकतो. परिणामी डोळ्यांमध्ये कोरडेपणा, जळजळ, खाज आणि लालसरपणा निर्माण होऊ शकतो.

### झोपेची कमतरताही ठरते कारण

बराच वेळ वाचन करणे, वाहन चालवणे किंवा संगणकावर काम करणे यामुळेही डोळ्यांवर ताण येतो. पुरेशी झोप न मिळाल्यामुळे डोळे कोरडे आणि थकलेले वाटू शकतात. याशिवाय वातानुकूलित यंत्रणा, पंख्याची थेट हवा, प्रदूषण, धूळ आणि धूर यांच्यामुळे डोळ्यांच्या पृष्ठभागावर अधिक जळजळ होऊ शकते.

### कॉन्टॅक्ट लेन्सचा वापर

कॉन्टॅक्ट लेन्स वापरणाऱ्यांनाही डोळे लाल होण्याचा त्रास होऊ शकतो. विशेषतः लेन्स दीर्घकाळ डोळ्यांत ठेवणे, लेन्सची योग्य प्रकारे स्वच्छता न करणे किंवा डोळे कोरडे असतानाही लेन्सचा वापर करणे यामुळे समस्या निर्माण होऊ शकते. ॲलर्जी हे देखील डोळे लाल होण्याचे एक सामान्य कारण आहे. विशेषतः डोळे लाल होण्यासोबत खाज येणे आणि डोळ्यांतून पाणी येणे अशी लक्षणे असल्यास ॲलर्जीची शक्यता असू शकते.

### काचबिंदू किंवा संसर्ग असल्यास तातडीने डॉक्टरांकडे जा...

डोळ्यांच्या लालसरपणासोबत मध्यम ते तीव्र वेदना, अंधुक किंवा कमी दिसणे, प्रकाशाची अतिशय जास्त संवेदनशीलता, तीव्र डोकेदुखी, मळमळ किंवा उलट्या, डोळ्यांतून मोठ्या प्रमाणात पाणी किंवा पू येणे, डोळ्याला दुखापत होणे किंवा डोळ्यात काहीतरी अडकले असल्यासारखे वाटणे अशी लक्षणे दिसल्यास तातडीने नेत्र तज्ज्ञांकडे जावे. तीव्र कोन-बंद काचबिंदू (Acute Angle-Closure Glaucoma) ही तुलनेने दुर्मिळ असली तरी डोळ्यांची आपत्कालीन स्थिती आहे. यामध्ये तीव्र डोळेदुखी, लालसरपणा, अंधुक दिसणे, दिव्याभोवती वलय दिसणे, डोकेदुखी, मळमळ आणि उलट्या होऊ शकतात. या स्थितीत तातडीने उपचार आवश्यक असतात. कारण डोळ्यांतील दाब अचानक वाढल्यास दृष्टीला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. त्याचप्रमाणे, कॉन्टॅक्ट लेन्स वापरणाऱ्या व्यक्तीचे डोळे लाल झाले असून त्यासोबत वेदनाही होत असतील, तर काही दिवस स्वतःहून बरे होण्याची वाट पाहू नये. अशा वेळी कॉर्नियाचा संसर्ग वेगाने वाढू शकतो.

### डोळे निरोगी ठेवण्यासाठी या सवयी अंगीकारा...

डोळे निरोगी ठेवण्यासाठी काही सोप्या आणि नियमित सवयी फायदेशीर ठरतात. स्क्रीनकडे पाहताना नियमित विश्रांती घ्या, वारंवार पापण्यांची उघडझाप करा आणि स्क्रीनपासून आरामदायी अंतर ठेवा. सोयीचे वाटत असल्यास स्क्रीन डोळ्यांच्या पातळीपेक्षा किंचित खाली ठेवता येते. अतिशय कोरड्या वातावरणात दीर्घकाळ काम करणे टाळावे आणि कामाच्या ठिकाणी पुरेसा प्रकाश असल्याची खात्री करावी. पुरेशी झोप घ्या, शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहा आणि संतुलित आहार घ्या. आहारात भाज्या, फळे, कडधान्ये, कडबोळी, बिया तसेच प्रथिने आणि आरोग्यदायी चरबीचे स्रोत यांचा समावेश असावा. डोळे लाल होणे वारंवार होत असेल किंवा त्यासोबत वेदना, दृष्टी धूसर होणे, प्रकाशाची संवेदनशीलता किंवा अन्य गंभीर लक्षणे जाणवत असतील, तर विलंब न करता नेत्ररोगतज्ज्ञांचा सल्ला घ्या.

### स्क्रीन टाइमशिवाय डोळे लाल होण्याची इतर कारणे...

डोळे लाल होण्यामागे नेहमीच स्क्रीनचा वापर कारणीभूत असेल असे नाही. डोळ्यांचा कोरडेपणा, ॲलर्जी, धूळ किंवा धुराचा संपर्क, कॉन्टॅक्ट लेन्समुळे होणारी जळजळ आणि पापण्यांची सूज यामुळेही डोळे लाल होऊ शकतात. काही वेळा डोळ्याच्या पृष्ठभागावरील एखादी अतिशय लहान रक्तवाहिनी फुटते. त्यामुळे डोळ्याच्या पांढऱ्या भागावर ठळक लाल डाग दिसतो. या स्थितीला सबकंजंक्टिव्हल हेमरेज (डोळ्याच्या पृष्ठभागाखाली रक्तस्राव) असे म्हणतात. हे दिसायला भीतीदायक वाटू शकते; मात्र, बहुतेक वेळा यात वेदना होत नाहीत आणि हा लाल डाग एक ते दोन आठवड्यांत आपोआप कमी होतो. मात्र, डोळे लाल होण्यासोबत तीव्र वेदना, प्रकाश सहन न होणे, अंधुक दिसणे, डोळ्यांतून काही स्त्रवणे किंवा सूज अशी लक्षणे दिसत असतील तर अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. डोळ्यांचा संसर्ग किंवा कंजंक्टिव्हायटिस (डोळे येणे), कॉर्नियाचा संसर्ग, युव्हायटिस तसेच काही वेळा तीव्र काचबिंदू (ॲक्युट ग्लॉकोमा) यांसारख्या स्थितींमध्येही डोळे लाल होऊ शकतात.

### लालसरपणा कमी करण्यासाठी काय करावे?

» डोळ्यांना नियमित विश्रांती द्या : दीर्घकाळ संगणक किंवा मोबाइलवर काम करत असल्यास २०-२०-२० नियमाचा वापर करा. साधारण दर २० मिनिटांनी किमान २० सेकंदांसाठी सुमारे २० फूट दूर असलेल्या वस्तूकडे पाहा. यासोबतच काम करताना जाणीवपूर्वक आणि वारंवार पूर्णपणे पापण्यांची उघडझाप करा. यामुळे डोळ्यांच्या पृष्ठभागावरील ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होते.

» थंड पाण्याची शेक द्या : डोळे बंद करून त्यावर काही मिनिटे स्वच्छ, थंड आणि ओलसर कापड ठेवले तर काही काळ आराम मिळू शकतो. विशेषतः डोळ्यांमध्ये जळजळ किंवा थकवा जाणवत असल्यास याचा फायदा होऊ शकतो. मात्र, पापण्यांवर थेट बर्फ ठेवणे टाळावे.

» डोळ्यांच्या कोरडेपणाकडे लक्ष द्या : पुरेसे पाणी प्या, नियमित आणि पुरेशी झोप घ्या. पंखा किंवा वातानुकूलित यंत्रणेची थेट हवा डोळ्यांवर येणार नाही याची काळजी घ्या. डोळे वारंवार कोरडे पडत असतील, तर नेत्रतज्ज्ञांकडून तपासणी करून घ्यावी. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार परिरक्षकविरहित स्नेहक डोळ्यांत टाकण्याचे औषध (लुब्रिकेटिंग आय ड्रॉप्स) वापरता येऊ शकते.

### डोळ्यांचा लालसरपणा वाढवणाऱ्या चुका टाळा

» डोळे चोळू नका : डोळे चोळणे ही सर्वांत सामान्य चुकांपैकी एक आहे. त्यामुळे डोळ्यांच्या पृष्ठभागावर अधिक जळजळ होऊ शकते आणि ॲलर्जीची लक्षणेही वाढू शकतात. डोळ्यांत संसर्ग झाल्याची शक्यता असल्यास डोळे चोळणे पूर्णपणे टाळणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

» दुसऱ्याच्या डोळ्यांच्या औषधांचा वापर करू नका : दुसऱ्या व्यक्तीच्या डोळ्यांत टाकण्याच्या औषधांचा वापर करणे किंवा डोळे लाल होण्याचे कारण माहीत नसतानाही जुनी औषधे वापरत राहणे टाळावे. विशेषतः स्टेरॉइडयुक्त डोळ्यांतील औषधांचा वापर स्वतःच्या मनाने करू नये. चुकीच्या पद्धतीने वापरल्यास काही संसर्ग अधिक वाढू शकतात आणि डोळ्यांवरील दाबही वाढू शकतो.

» डोळे लाल असतानाही कॉन्टॅक्ट लेन्स वापरू नका : कॉन्टॅक्ट लेन्स वापरणाऱ्यांचे डोळे लाल झाले किंवा अस्वस्थ वाटू लागले, तर लेन्स काढून टाकावेत आणि डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. विशेषतः डोळ्यांत वेदना किंवा दृष्टीत अडचण असल्यास विलंब करू नये. डोळ्यांत जळजळ किंवा संसर्ग असताना कॉन्टॅक्ट लेन्स वापरत राहिल्यास गुंतागुंत होण्याचा धोका वाढू शकतो.



## व्यायाम केल्यानंतर अचानक चक्कर का येते? हृदयाची समस्या की रक्तदाबात बिघाड?

**नियमित व्यायाम आणि कसरत करणे शरीर तंदुरुस्त ठेवण्याचा प्रभावी मार्ग आहे. मात्र, काही जणांना व्यायाम किंवा कसरत केल्यानंतर अचानक डोके गरगरणे, चक्कर येणे किंवा डोळ्यांसमोर अंधारी येण्याचा त्रास जाणवतो. प्रत्येक वेळी हे एखाद्या गंभीर आजाराचे लक्षण असेलच असे नाही. मात्र, व्यायामानंतर वारंवार चक्कर येत असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घेऊन त्यामागचे नेमके कारण जाणून घेणे आवश्यक आहे. शरीरातील पाण्याची किंवा क्षारांची कमतरता, रक्तदाबातील चढ-उतार, रक्तातील साखरेच्या पातळीतील बदल यांसह काही वेळा हृदयाशी संबंधित समस्या यामागे असू शकतात.**

» व्यायामानंतर अचानक चक्कर का येते? : आजच्या काळात आरोग्याबाबत जागरूकता वाढल्याने व्यायामशाळेत जाणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र, अनेकांना अतितीव्र व्यायाम किंवा कसरत केल्यानंतर चक्कर येण्याचा अनुभव येतो. काहींना चक्कर येण्यासोबत डोळ्यांसमोर अंधारीही येते. यामागे शरीरातील पाणी किंवा इलेक्ट्रोलाइट्सची कमतरता, रक्तदाबातील चढ-उतार, रक्तातील साखरेतील बदल किंवा काही वेळा हृदयाशी संबंधित समस्या कारणीभूत असू शकतात. क्लीव्हलँड क्लिनिकच्या माहितीनुसार, व्यायामानंतर सौम्य चक्कर येणे किंवा डोके हलके वाटणे यामागे अनेक कारणे असू शकतात. विशेषतः बराच काळ व्यायाम न केल्यानंतर अचानक व्यायाम सुरू केला, अतिवेगाने किंवा बराच वेळ कसरत केली, अचानक व्यायाम थांबवला किंवा उष्ण वातावरणात व्यायाम केला, तर काही काळ चक्कर येऊ शकते. व्यायाम करताना शरीरातील रक्तवाहिन्या रुंदावतात आणि रक्तप्रवाह प्रामुख्याने सक्रिय स्नायूंकडे वाढतो. व्यायाम संपल्यानंतर रक्तदाब आणि रक्तप्रवाह पूर्ववत होण्यासाठी शरीराला काही वेळ लागतो. या काळात डोके हलके होणे किंवा चक्कर येणे जाणवू शकते.

» अचानक व्यायाम थांबवल्याने रक्तदाब का कमी होतो? : वेगाने धावणे, सायकल चालवणे, एचआयआयटी (HIIT) किंवा अन्य तीव्र स्वरूपाचा व्यायाम केल्यानंतर अचानक थांबल्यास पायांच्या स्नायूंची हालचाल अचानक कमी होते.



व्यायामादरम्यान हे स्नायू रक्त हृदयाकडे परत पोहोचवण्यासाठी 'स्नायू पंप'प्रमाणे काम करतात. व्यायामादरम्यान रुंदावलेल्या रक्तवाहिन्या काही काळ तशाच राहू शकतात. त्यामुळे पायांच्या भागात रक्त साचण्याची शक्यता वाढते आणि रक्तदाब तात्पुरता कमी होऊ शकतो. परिणामी डोके हलके वाटणे, चक्कर येणे किंवा बेशुद्ध पडल्यासारखे वाटणे अशी लक्षणे जाणवू शकतात. एनसीबीआयच्या माहितीनुसार, या स्थितीला व्यायामानंतरचा रक्तदाब कमी होणे (Post-Exercise Hypotension) असे म्हणतात. २०२४ मधील एका आढाव्यानुसार, व्यायामानंतर रक्तदाब कमी होण्यामागे स्वायत्त मज्जासंस्था, बॅरोरिफ्लेक्स तसेच हृदय आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित विविध यंत्रणांची भूमिका असू शकते.

» शरीरातील पाणी आणि क्षारांची कमतरताही कारणीभूत : व्यायाम करताना घामाच्या माध्यमातून शरीरातील पाण्यासोबत सोडियम आणि इतर इलेक्ट्रोलाइट्सचे प्रमाणही कमी होते. घामातून गमावलेल्या द्रवपदार्थांची पुरेशी भरपाई न झाल्यास शरीरात पाण्याची कमतरता म्हणजेच निर्जलीकरण (डिहायड्रेशन) होऊ शकते. निर्जलीकरणाची लक्षणे म्हणजे तहान लागणे, अशक्तपणा, डोकेदुखी, स्नायूंमध्ये आकडी येणे आणि चक्कर येणे. मात्र, याचा अर्थ व्यायाम करताना गरजेपेक्षा जास्त पाणी पिणे सुरक्षित आहे, असा होत नाही. अतिप्रमाणात पाणी प्यायल्यास रक्तातील सोडियमचे प्रमाण खूप कमी होऊ शकते. या स्थितीला व्यायामाशी संबंधित हायपोनॅट्रेमिया (Exercise-Associated Hyponatremia) म्हणतात. यामध्येही डोकेदुखी, उलट्या, अशक्तपणा आणि चक्कर येणे यांसारखी लक्षणे दिसू शकतात.

### चक्कर येत असल्यास काय करावे?

व्यायामानंतर सौम्य स्वरूपाची आणि काही काळापुरती चक्कर येणे अनेकदा शरीराची सामान्य शारीरिक प्रतिक्रिया असू शकते. विशेषतः अतितीव्र व्यायाम केल्यानंतर किंवा अचानक व्यायाम थांबवल्यानंतर असे होऊ शकते. मात्र, व्यायामानंतर वारंवार चक्कर येत असेल, त्यासोबत श्वास लागणे, छातीत दुखणे किंवा हृदयाची धडधड अनियमित होणे अशी लक्षणे जाणवत असतील, तर ही गंभीर इशारा देणारी चिन्हे असू शकतात. अशा वेळी व्यायामाकडे दुर्लक्ष करून सुरू ठेवण्याऐवजी तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेणे आणि चक्कर येण्यामागचे नेमके कारण तपासून घेणे महत्त्वाचे आहे.

# खेळाडूंच्या नोकर भरतीचे सुधारित आरक्षण धोरण मंजूर

## ■ राज्य मंत्रिमंडळाचे ७ निर्णय



**मुंबई (प्रतिनिधी)** –राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत क्रीडा, आरोग्य, वस्त्रोद्योग आणि विधी व न्याय विभागाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय नोकऱ्यां-मध्ये मिळणाऱ्या आरक्षणाबाबत सुधारित धोरण लागू करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

याशिवाय सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या (DB) सहकार्याने नवा प्रकल्प राबवण्यास आणि सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे नवीन सत्र न्यायालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

राज्यातील यशस्वी आणि गुणवंत खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रांतील नोकऱ्यांमध्ये मिळणाऱ्या ५ टक्के आरक्षणाबाबत सुधारित धोरण लागू करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या नवीन सुधारित धोरणामुळे पूर्वीचे सर्व शासन निर्णय (GR), शासन शुद्धिपत्रके, परिपत्रके आणि संबंधित पत्रे पूर्णपणे रद्द करण्यात आली आहेत.

सार्वजनिक आरोग्य यंत्रणा अधिक सुदृढ, अद्ययावत आणि तंत्रज्ञानस्नेही करण्यासाठी प्रगती प्रकल्प राबवला जाणार आहे. हा प्रकल्प सन २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीत राबवला जाईल. यासाठी आशियाई विकास बँकेकडून (DB) कर्ज घेण्यास आणि त्यात राज्य शासनाचा हिस्सा समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात आली.

माढा येथे नवीन न्यायालय: सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे नवीन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यात येणार आहे. या न्यायालयासाठी आवश्यक असणारी पदे निर्माण करण्यास आणि खर्चाच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

कैवल्यधाम योगिक सेंटर: मुंबईतील 'कैवल्यधाम ईश्वरदास चुन्नीलाल योगिक सेंटर'च्या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे सवलतीच्या दराने नूतनीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली. बुद्धिस्ट मिशनला जमीन: चेंबूर येथील 'भिक्खू संघ युनायटेड बुद्धिस्ट मिशन' या संस्थेला त्यांच्या सध्याच्या वहिवाटीत असलेली जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

कोराडी तीर्थक्षेत्र विकास: नागपूर जिल्ह्यातील कोराडी येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत विकसित करण्यात येत असलेली शासकीय जमीन 'श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानाला' हस्तांतरित करण्यास मंजुरी दिली.

## Change In Name

Name of change Declaration Here in this advertise I am declaring that I have change My Name which was :-TABASSUM BEGUM QURESHI. TO:- TABASSUM JALEEL QURESHI. Hence for this Declaration i will be known by this name and will use in future the TABASSUM JALEEL QURESHI.will used by my family husband /wife, children and relative. OLDNAME:- TABASSUM BEGUM QURESHI. NEW NAME:- TABASSUM JALEEL QURESHI. Address- 355, GANDHI NAGAR,NANDED ROAD, NARSI, NARSI, DIST NANDED, Narsi, PO:Naigaon, Maharastra, 431709. Aadhaar No :- 653572438664. Mob no - 9822301188

## Change In Name

Name of change Declaration Here in this advertise I am declaring that I have change My Name which was :-QURESHI jalil Hydersab. TO:- JALEEL HAIDERSAB QURESHI. Hence for this Declaration i will be known by this name and will use in future the JALEEL HAIDERSAB QURESHI.will used by my family husband /wife, children and relative. OLDNAME:- QURESHI JALIL HYDERSAB. NEWNAME:- JALEEL HAIDERSAB QURESHI. Address- 355, GANDHI NAGAR,NANDED ROAD, NARSI, NARSI, DIST NANDED, Narsi, PO:Naigaon, Maharastra, 431709. Aadhaar no :- 859423107642. Mob No. - 9822301188

## Change In Name

My old Name is SHUBHAM GOPALRAO SONTAKKE Now i am Changing as New Name SHUBHAM GOPAL SONTAKKE Hence Forth My All Corracepondance Will Be Done As Per My New Name. Please Kindly Consider The Same.

Adress-Parwana Nagar bank colony thorda khurdha nanded Pin code-431605

## टी. सी. हरवली

माझी गायकवाड सुनिल मच्छिंद्र या नावाची इयत्ता ७ वी पासची टी. सी. नांदेड ते मुखेड दरम्यान प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**–गायकवाड सुनिल मच्छिंद्र ता. मुखेड जि. नांदेड.

## टी. सी. हरवली

माझी प्रथमेश गणेश स्वामी या नावाची इयत्ता बारावी विज्ञान पास टी.सी. व इतर कागदपत्रं देगलूर ते नांदेड प्रवासात हरवली आहेत. कृपया कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा ही विनंती. **संपर्क पत्ता**–प्रथमेश गणेश स्वामी मु.पो. एकलारा ता. मुखेड, जि. नांदेड

## टी. सी. हरवली

माझी अमोल दिगंबर कांबळे या नावाची इयत्ता एम. एस्सी (बॉयो. केमि.)पासची टी. सी. चैतन्यनगर ते रेल्वे स्टेशन दरम्यान प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**–अमोल दिगंबर कांबळे रा. शिवसाई नगर तरोडा बु. नांदेड. मो. ९७६६८८५३०३


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## बिडी मजदूर गृहनिर्माण सहकारी संस्था म. धर्माबाद, ता. धर्माबाद जि. नांदेड
## वार्षिक सभेची नोटीस
### (फक्त सभासदासाठी)

दिनांक : ११/०९/२०२६

**बिडी मजदुर गृहनिर्माण सहकारी संस्था म. धर्माबादच्या सर्व सभासदांना विनंती पूर्वक कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची वार्षीक सर्वसाधारण सभा दिनांक २६/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता दुर्गामाता मंदिर सभामंडप रामपूर रोड धर्मामाबाद बस स्टैंड जवळ संस्थेच्या जागे जवळ धर्माबाद येथे चेरअमन श्री सुरेश नारायणराव बासलवार यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजीत करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे हि विनंती.**

**सभेपुढील विषय :**
१) मागील सभेचे वृतांत वाचुन कायम करणे.
२) सन २०२३-२०२४ ची जमा खर्च नफा तोटा, ताळेबद पत्रक वाचुन त्यास मान्यता देणे.
३) सन २०२४-२०२५ चे खर्चाचे आंदाजपत्रकास मान्यता देणे.
४) संस्थेच्या वद्यानिक लेखा परीक्षणासाठी ऑडीटरची नेमणुक करणे.
५) आयत्या वेळी येणारे विषय अध्यक्षाचे परवानगीने चर्चीले जातील.

**आपला विश्वासू,**
**प्रति, मा. सहायक निबंधक साहेब,**
**सहकारी संस्था ता.धर्माबाद,**
**सौ. ए.जी. चुनुकवाड**
**सचिव**
**संचालक मंडळाचे आदेशावरुन**

प्रति, मा. सहायक निबंधक साहेब,
सहकारी संस्था ता. धर्माबाद
यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव सेवेत सादर

**नोट :** सभा कोरम अभावी तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्यावेळी कोरमची आवश्यकता भासणार नाही. आवश्यक २ संस्थेची आर्थिक पत्रके संस्थेचे नोटीस बोर्डावर लावण्यात आली आहेत.

## सिटी अर्बन
## कॉ-ऑपेराटीव्ह क्रेडिट सोसायटी लि. नांदेड

**पत्ता:- अर्थालय, १-२४-३७, हॉल नं. २०१**
**मीरा रेसिडेन्सी ए, व्ही. आय. प. रोड, नांदेड. ४३१६०२**

## प्रथम वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
### (फक्त सभासदांकरिता )

आपल्या संस्थेचे सर्व सन्माननीय सभासदांना विनम्रपणे कळविण्यात येते की, संस्थेची प्रथम वार्षिक सर्वसाधारण सभा नियमास अधिक राहून संस्थेच्या अध्यक्षा सौ. संजना विशालसिंह तेहरा यांच्या म ार्गदर्शनाखाली दि. २४/०९/२०२६ रोजी गुरुवार सकाळी ११:३० वाजता संस्थेचा मुख्य कार्यालय व्ही. आय. पी. रोड, नवा मोंढा, नांदेड येथे खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सदरील वार्षिक सभेला उपस्थित राहावे. हि विनंती.

### -: सभेपुढील विषय :-

१. दिनांक २४/१०/२०२४ ते दि. ३१/०३/२०२६ अखेर सिटी अर्बन संस्थेचे या संपलेल्या आर्थिक वर्षाचे अहवाल, ताळेबंद, आणि नफा-तोटा पत्रक मंजूर करणे. २. दि. ०१/०४/२०२५ ते दि. ३१/०३/२०२६ च्या आर्थिक वर्षात झालेल्या खर्चास मान्यता देणे. ३. सन २०२५-२०२६ वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करणे तसेच त्रुटी, दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.४. सुधारित आदर्श उपविधी स्वीकारणेबाबत. ५. कायदा कलम २६(२)() च्या परंतुका सद्रच्या सभेस उपस्थित न राहिल्येल्या सन्माननीय सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे व सभासदांना प्रशिक्षण देण्याबाबत विचार करणे. ६. सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक करणे व त्याची ऑडिट फीस ठरवणे. ७. मा. अध्यक्षांचा परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चाविनिमय करणे.

दिनांक:- २७/०८/२०२६
ठिकाण: अर्थालय, व्ही. आय. पी. रोड,
नवा मोंढा, नांदेड. ४३१६०२

**संचालक मंडळाच्या आदेशावरून**
**मुख्याधिकारी/ व्यवस्थापक**

**सूचना-१.** गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा ठरलेल्या ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही. २. कोणत्याही सभासदास काही प्रश्न विचारायचे असल्यास सभेच्या दिनांकापूर्वीच किमान ५ दिवस अगोदर संस्थेस लेखी स्वरूपात कळवावे.

**नोंदणी क्र.** NND/RSR/(०)/८३३/२०२६

## भगवान श्री चक्रधर स्वामी ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या, नांदेड

**पत्ता: नवा मोंढा कमान क्र.०२ कृषी उत्पन्न बाजार समिती, वजन काटा जवळ, नांदेड.**
**मो न : ९७६६८८९६७८** **ईमेल:** hr@bscsgramin.com

जा.क्र. : BSCSGSPN/2026/04 दि. ०९/०९/२०२६.

## पहिली वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

प्रति,
अध्यक्ष
भगवान श्री चक्रधर स्वामी ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या, नांदेड.
श्री. आनंदराव पंजाबराव मुंगल

संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासद बंधू भगिनींना विनंती पूर्वक कळविण्यात येते की, भगवान श्री चक्रधर स्वामी ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या, नांदेड. आपल्या संस्थेची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २८/०९/२०२६ रोजी वार सोमवार ठिक सकाळी ११.०० वाजता संस्थेचे अध्यक्ष श्री. आनंदराव पंजाबराव मुंगल यांच्या अध्यक्षतेखाली नवीन मोंढा, कमान क्र .०२ कृषी उत्पन्न बाजार समिती, वजन काटा जवळ, नांदेड. येथे घेण्यात येणार असून सदरील सभेत खालील विषयावर सभा घेवून निर्णय घेण्यात येणार आहे. तरी आपण सभेस वेळेवर उपस्थित राहावे हि विनंती. सभेपुढील विषयः -

१. मागील कार्यकारी मंडळ सभेचे इतिव्रतान्त वाचून कायम करणे बाबत.
२. दिनांक ३१/०८/२०२६ चे जमा खर्च पत्रक, नफा तोटा व ताळेबंद पत्रक वाचून कायम करणे.
३. दि. ३१.०८.२०२६ पर्यंतच्या झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत
५. सन २०२६-२७ सालासाठी खर्चाचे अंदाज पत्रकास मंजूरी देणे,
६. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे बाबत.
७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इत्तर विषय

स्थळ: नांदेड. मुख्य कार्यकारी अधिकारी
दिनांक : ०७/०९/२०२६ भगवान श्री चक्रधर स्वामी ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या, नांदेड

**विशेष सूचना:** १) पोट नियमा नूसार सभा तहबुक झाल्यास सदर स्थगित सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी नियोजित वेळेवर अर्ध्या तासाने घेण्यात येईल. (२) ज्या सभासदांना संस्थेच्या चांगल्या कामाबद्दल सूचना करावयाच्या किंवा अडी अडचणी असतील त्यांनी दिनांक २०/०९/२०२६ पर्यंत सायं ५.०० वाजेपर्यंत लेखी स्वरूपात मिळतील असे पाठवावे, त्यानंतर आलेल्या किंवा आपल्या देळी येणा-या विषयांचा विचार केला जाणार नाही.

## अधिसूचना कलम ११

### भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३

### २०२५/उपजिअ/भूस/पातलसिकाक्र.२/मौ.धानोरा/सीआर-०४

ज्याअर्थी, भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण १९/२०१४ प्र.क्र.७७/अ, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ( ३ ) च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिका- यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे;

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ।। च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यात भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत ओडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. त्याअर्थी, आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही. परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून, अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल; परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ।। च्या पोट कलम ( ५ ) अनुसार, जिल्हाधिकारी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम-२०१३ (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करण्यात असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) पा.त.ल.सिं.का.क्र.२ नांदेड यास पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची एक

संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन
गावः मौ. धानोरा खु.
ता. धर्माबाद जि. नांदेड

| अ.क्र. | भूमापन क्र. किंवा गट क्र. | क्षेत्र हेक्टर आर मध्ये |
|---|---|---|
| ०१ | १८४ | ०.०४ |
| ०२ | २१९ | ०.१९ |
| ०३ | २२० | ०.७१ |
| ०४ | २५२ | ०.०२ |
| ०५ | २१५ | ०.०३ |
| | एकूण क्षेत्र | ०.९९ हे. आर |

### अनुसूची दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांवः अतिरिक्त भूसंपादन प्रस्ताव करखेली शाखा कालवा सा. क्र २५२० मी. वरील उजवी वितरीका क्र ०१ वरील उजवा लघु कालवा क्र ०१ मौजे धानोरा खु. ता. धर्माबाद जि. नांदेड.

प्रकल्प कार्यालयाचे वर्णनः कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.८ नांदेड. समाजाला मिळणारे लाभः जलसिंचन.

### अनुसूची तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्याची आवश्यकता नाही.

### अनुसूची चार

भूसंपादन जनतेच्या पायाभूत सुविधांसाठी होत असल्याने सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाचा अभिप्राय आवश्यक नाही.

### अनुसूची पाच

प्रशासकाची नियुक्ती करणे आवश्यक नाही.

टिपः- उक्त जमिनीच्या आराखड्याचे निरिक्षण उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) पातलसिंका क्र. २. जि.अ.का. नांदेड यांचे कार्यालयात करता येईल.

दिनाक :- २१/०७/२०२६
ठिकाण: नांदेड

(संतोषी देवकुळे)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
पातलसिंका क्र. ०२ नांदेड

जिमाका/नां/जाहिरात/ ८०/२०२६/२०२७

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# 'तुमसे ना हो पायेगा'चा नारा: शुक्रवारी खा. संजय राऊत नांदेडमध्ये, शिवसेना जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार

## मराठवाड्यासह नांदेडच्या रखडलेल्या विकासावरून ठाकरे गटाचा एल्गार

**नांदेड (प्रतिनिधी)-** मराठवाडा विकासाच्या केवळ घोषणा करून प्रत्यक्षात कामे अर्धवट ठेवणाऱ्या सरकारविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आक्रमक झाली आहे. 'तुमसे ना हो पायेगा' या जनआंदोलनाच्या माध्यमातून सरकारला जाब विचारण्यासाठी ११ सप्टेंबर रोजी शिवसेना नेते खा. संजय राऊत यांच्या नेतृत्वाखाली आणि माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांच्या संयोजनाने नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे.

मंगळवार, दिनांक ८ सप्टेंबर रोजी हॉटेल मिडलँड येथे झालेल्या पत्रकार



परिषदेत जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, पुरुषोत्तम धोंडगे, धोंडू पाटील यांनी ही माहिती दिली. जिल्ह्यातील रखडलेल्या विकासकामांचा हिशेब जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे मागितला जाणार आहे.

शिवसेनेचा आरोप आहे की, हेलिकॉप्टरचे सुटे भाग तयार करणारा उद्योग, गोदावरी रिव्हरफ्रंट, १८ निजामकालीन पोलीस ठाण्यांचा कायापालट, नांदेड-वाघाळा शहर महापालिका मलनिःसारण व घनकचरा बायोगॅस प्रकल्प, मराठवाडा मुक्तिसंग्राम माहिती संग्रहालय, लोहा पाणीपुरवठा योजना, बाभळी मध्यम प्रकल्प, उणकेश्वर उच्च पातळी बंधारा, शासकीय कृषी महाविद्यालय, लेंडी सिंचन प्रकल्प, वर्धा- यवतमाळ- नांदेड रेल्वेमार्ग, नांदेड विमानतळ विस्तार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विस्तार, माहूर पर्यटन व तीर्थक्षेत्र विकास आराखडा, भोकर मतदारसंघातील वॉटर ग्रीड पाणीपुरवठा योजना अशा अनेक घोषणांचा सरकारला विसर पडला आहे.

तसेच लोडशेडिंग, व्होल्टेज ड्रॉप, अनियमित वीजपुरवठ्यामुळे शेतकरी हैराण असून, जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करावा, राष्ट्रीय महामार्गावरील पुलाची चौकशी, मेंढला व कृष्णूर हेलिकॉप्टर प्रकल्प, शेतकरी आत्महत्या आणि हक्काच्या पाण्याचा प्रश्न यावरही सरकारला घेरणार असल्याचे सांगण्यात आले.

घोषणांचा पाऊस आणि कामांच्या नावाने ठणठणाट करणाऱ्या सरकारला जनतेच्या प्रश्नांपासून पळता येणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनामध्ये जिल्ह्यातील शिवसेना, युवासेनेचे आणि महिला आघाडीच्या प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते यासह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचेही बारसे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला माजी संपर्कप्रमुख धोंडू पाटील, सहसंपर्कप्रमुख दयाल गिरी, युवासेनेचे विभागीय सचिव महेश खेडकर, उपजिल्हाप्रमुख राम चव्हाण, तालुकाप्रमुख सुनील पाटील कदम, महानगरप्रमुख (दक्षिण) मनोज यादव, माधव पांचाळ, नवनाथ जोगदंड, नंदू पाटील वैद्य, पुरभाजी जाधव पासदगावकर, सलाउद्दीन काजी, प्रभाकर सोनटक्के, परवेज शेख, शहरप्रमुख अर्जुनसिंह ठाकूर, पिंटू सुनपे, विजय कल्याणकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# आ. कल्याणकर व आ. बोंढारकर यांनी घेतली मराठा योद्धा जरांगे पाटील यांची भेट




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)-** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू आहे.

रात्री उपोषणस्थळी प्रत्यक्ष आमदार आनंदराव पाटील बोंढारकर आणि आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी भेट देऊन मनोज जरांगे यांची भेट घेतली. यावेळी मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भातील त्यांच्या मागण्या व भूमिका सविस्तरपणे समजून घेतल्या. तसेच त्यांच्या या संघर्षाला दोन्ही आमदारांनी पाठिंबा दिला.

यावेळी जरांगे यांच्या तब्येतीची विचारपूस करून काळजी घेण्याची विनंती आ. कल्याणकर व आ. बोंढारकर यांनी केली. मराठा समाजाच्या भावना, अपेक्षा आणि प्रश्न हे आपल्या सर्वांसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांना योग्य तो न्याय मिळावा, अशी अपेक्षा असल्याचे उभय आमदारांनी म्हटले.

या भेटीदरम्यान शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, युवासेना जिल्हाप्रमुख बाळू पाटील मोरे, तालुकाप्रमुख गणेश बोकारे, धनंजय सूर्यवंशी, ओमकार सूर्यवंशी यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# नांदेडमध्ये खरीप हंगाम धोक्यात: पावसाचा प्रदीर्घ खंड, कोरडा दुष्काळ जाहीर करा आणि क्लाऊड सीडिंग करा -खा. रवींद्र चव्हाण यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)-** नांदेड जिल्ह्यात पावसाने प्रदीर्घ खंड दिल्याने खरीप हंगाम धोक्यात आला आहे. सोयाबीनच्या शेंगा भरण्याच्या महत्त्वाच्या अवस्थेतच पाऊस गायब झाल्याने पिके वाळू लागली असून, उत्पादनात मोठी घट होण्याची भीती आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून ढग बीजारोपण करावे, अशी मागणी खा. रवींद्र चव्हाण यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली आहे.



खा. रविंद्र चव्हाण यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पावसाअभावी केवळ सोयाबीनच नव्हे तर कापूस, तूर, मूग, उडीद या पिकांवरही गंभीर परिणाम होत आहे. जिल्ह्यातील पर्जन्यमानातील तूट, जमिनीतील ओलाव्यात झालेली घट आणि जलस्रोतांची स्थिती चिंताजनक आहे. त्यामुळे तातडीने तालुका-निहाय तांत्रिक व क्षेत्रीय पाहणी करून, शासनाच्या दुष्काळ निकषांनुसार नांदेडमध्ये कोरडा दुष्काळ जाहीर करण्याचा निर्णय घ्यावा.

पावसाचा खंड कायम राहिल्यास भारतीय हवामान विभाग (IMD) व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ढग बीजारोपणाची तांत्रिक व्यवहार्यता तपासून अनुकूल वातावरण असल्यास जिल्ह्यात क्लाऊड सीडिंग राबवावे, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

# विशाखापट्टणम ते जळगाव गांजा तस्करीला ५ वर्षांनंतर दणका; बिलोली कोर्टाचा निकाल, दोघांना १० वर्षे सक्तमजुरी व १ लाख दंड

नांदेड (प्रतिनिधी)- अंमली पदार्थांची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन आरोपींना बिलोली येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने प्रत्येकी १० वर्षे सश्रम कारावास आणि १ लाख रुपये दंडाची कडक शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास अतिरिक्त ६ महिने कारावास भोगावा लागेल. जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर. व्ही. हुद्दार यांनी मंगळवार, दिनांक ८ सप्टेंबर रोजी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला.

गोकुळ नारायण राजपूत (वय ३२), रा. होणोबाचीवाडी, ता. पैठण, जि. संभाजीनगर आणि सुनील यादव महाजन (वय ३५), रा. जिजामाता शाळा परिसर, एरंडोल, जि. जळगाव यांना शिक्षा झाली.

दि. १५ नोव्हेंबर २०२१ रोजी नार्को नियंत्रण ब्युरो (NCB) मुंबईचे तत्कालीन विभागीय अधिकारी समीर वानखेडे यांना गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार नायगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत गडगा ते कहाळा रोडवरील महाबोधी बौद्ध विहाराजवळ पहाटे ५.४५ वाजता सापळा रचून ट्रक क्र. MH २६ D २१६५ अडवण्यात आला.

या ट्रकमध्ये विशाखापट्टणम येथून जळगावकडे बेकायदेशीररित्या वाहतूक होत असलेला १ क्विंटल २७ किलो गांजा जप्त करण्यात आला होता. NCB चे अधिकारी अमोल मोरे यांच्या फिर्यादीवरून नायगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. ९८/२०२१ दाखल झाला होता.

तपास अधिकारी विठ्ठल पवार यांनी दोषारोपपत्र सादर केले. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षातर्फे ५ साक्षीदार तपासण्यात आले. भक्कम पुरावे आणि युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने दोघांना NDPS Act १९८५ चे कलम ८(क), २०(ब)(२)(क), २८ आणि २९ अन्वये दोषी ठरवले.

या खटल्यात सरकारतर्फे सहायक सरकारी अभियोक्ता संदीप कुंडलवाडीकर यांनी बाजू मांडली. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पैरवी कर्मचारी एच. एन. सुगांवे, एएसआय नायगाव शेख इम्रान, लिपीक शेख मन्सूर आणि अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स नांदेडचे हवालदार महेंद्र दासरवार यांनी सहकार्य केले.

# नांदेड पोलिसांची अवैध व्यवसायांविरुद्ध मास रेड मोहीम; ३८ गुन्हे दाखल, ४३ आरोपींवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)-** जिल्ह्यातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने ७ सप्टेंबर रोजी जिल्हाभर एकाच वेळी विशेष 'मास रेड' मोहीम राबवण्यात आली.

या मोहिमेत सर्व पोलीस ठाण्यांनी समन्वयाने शहरी आणि ग्रामीण भागातील संशयित ठिकाणांवर छापे टाकून दारूबंदी, मटका-जुगार, गुटखा आणि गोवंश तस्करीवर कारवाई केली.

या एकदिवसीय मोहिमेत एकूण ३८ गुन्हे दाखल करून ४३ आरोपींवर कारवाई करण्यात आली असून, १० लाख ३८ हजार ८५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दारूबंदी- ५६ हजार ४३० रुपये, गोवंश तस्करी- ९ लाख ८० हजार रुपये, मटका / जुगार- २,४२० रुपये असा १० लाख ३८ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ठाणे प्रभारी अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली.

# 'चला हवा येऊ द्या' फेम कुशल बद्रिके १० सप्टेंबर रोजी वडेपुरीत

**नांदेड (प्रतिनिधी)-** येथील प्रसिद्ध माता रत्नेश्वरी देवीच्या दर्शनासाठी आणि ग्रामीण भागातील बैलपोळा सणाचा अनुभव घेण्यासाठी 'चला हवा येऊ द्या' फेम सुप्रसिद्ध अभिनेते कुशल बद्रिके हे गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी वडेपुरी येथे येणार आहेत.



वडेपुरी येथील भारती परिवार हा गावातील एक मान्यवर परिवार असून, वडेपुरीचे गुरु घर म्हणून त्यांची ओळख आहे. या परिवारातील समीर भारती हे मुंबईस्थित यशस्वी उद्योजक असून, त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांशी घनिष्ठ संबंध आहेत. कुशल बद्रिके हे समीर भारती यांचे जीवलग मित्र आहेत.

कुशल बद्रिके वडेपुरी येथे आल्यानंतर सर्वप्रथम माता रत्नेश्वरी देवीचे दर्शन घेतील. त्यानंतर रत्नेश्वरी विश्वस्त मंडळाच्या वतीने कुशल बद्रिके आणि समीर भारती यांचा सत्कार व स्वागत करण्यात येणार आहे. पुढे ते गावकऱ्यांशी संवाद साधणार असून, वडेपुरीतील नागरिकांशी हितगुज करतील. तसेच ग्रामीण संस्कृतीचे प्रतीक असलेल्या बैलपोळा सणाचा आनंदही ते अनुभवणार आहेत.

यापूर्वी पाणी फाउंडेशनच्या उपक्रमादरम्यान गावातील तरुणांचा उत्साह वाढावा यासाठी समीर भारती यांनी विविध टीव्ही कलाकारांना वडेपुरी येथे आणले होते. त्याचबरोबर त्यांनी गावासाठी मोठे योगदान देत तरुणांना प्रेरणा दिली होती. आता त्यांनी नामवंत अभिनेते कुशल बद्रिके यांना वडेपुरी येथे आणल्यामुळे गावकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पत्नी व सासूवर खंजरने हल्ला करणारा गंभीर गुन्ह्यातील पाहिजे आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहरातील गंभीर गुन्ह्यांतील पाहिजे आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या अनुषंगाने एसपी डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान वजिराबाद पोलीस ठाणे येथील खुनाच्या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी गगनसिंग ऊर्फ लक्की गणपत मिलवाले, शहीदपुरा, नांदेड यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली.

तक्रारदार महिलेने दिलेल्या माहितीनुसार तिचा पती गगनसिंग ऊर्फ लक्की मिलवाले याच्यासोबत पूर्वीपासून कौटुंबिक वाद सुरू होते. दिनांक २१ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजता मोबाईलवरून कोणाशी तरी चॅट केल्याच्या कारणावरून पती-पत्नीमध्ये वाद झाला. त्यावरुन आरोपीने फिर्यादी व सासूवर चाकूने हल्ला केला. त्यानंतर त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालय, विष्णुपुरी येथे हलविण्यात




आले. तेथे डॉक्टरांनी तक्रारदार महिलेच्या आईची तपासणी करून तिला मृत घोषित केले, तर तक्रारदार महिलेवर उपचार सुरू असल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी पोलीस ठाणे वजिराबाद येथे गु.र.नं. ४२५/२०२६ कलम १०३(१), १०९(१), ३(५), ३५१(२), ३५१(३) व ३५२ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बिलोली तालुक्यात दुष्काळ जाहीर करून एकरी ५० हजार रूपये देण्याची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)-** बिलोली तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्हा व महाराष्ट्रात यावर्षी पावसाने मोठी दडी मारल्यामुळे अत्यंत बिकट आणि चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप हंगामातील पेरणीनंतर पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे हाताशी आलेली सर्वच पिके (सोयाबीन, कापूस, मूग, उडीद इत्यादी) पूर्णपणे वाळून गेली आहेत.

आज शेतकरी बांधवांचे अतोनात नुकसान झाले असून परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे: भांडवली खर्चही निघणे अशक्य: बियाणे, खते, नांगरणी व लागवडीसाठी शेतकऱ्यांनी केलेला मोठा खर्चही पिकांच्या वाळण्यामुळे निघणे आता अशक्य झाले आहे.

निसर्गाच्या या अवकृपेमुळे व सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे बळीराजा पूर्णपणे आर्थिक संकटात सापडला असून, हवालदिल झाला आहे. उत्पन्नाचे सर्व मार्ग बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांमधील नैराश्य वाढले असून, दुर्दैवाने शेतकरी आत्महत्येसारख्या अत्यंत टोकाच्या घटनांमध्ये वाढ होत आहे, ही अत्यंत शोकांतिका आहे. बळीराजाला महाभयंकर संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि दुष्काळाच्या खाईतून वाचवण्यासाठी शासनाने तत्काळ ठोस पावले उचलणे अत्यंत गरजेचे आहे. बिलोली तालुक्यात व संपूर्ण बाधित भागात तत्काळ 'गंभीर दुष्काळ' जाहीर करण्यात यावा, पिकांच्या झालेल्या नुकसानीचा विचार करता शेतकऱ्यांना किमान ५० हजार रुपये प्रति, एकरी, आर्थिक मदत थेट त्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे कर्ज व वीजबिल तत्काळ माफ करण्यात यावे. आदी मागण्याचे निवेदन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तत्काळ शिफारसीसह पाठवावे व बिलोली तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस केदार पाटील साळुंके यांनी केली आहे.

# 'भिर्रररर'च्या लोकस्मृतीपासून 'आबा का जाबा का'च्या डिजिटल वास्तवापर्यंत नाट्यानुभव नांदेडकरांनी अनुभवला

## कै. जनार्दन आत्माराम चितळे युवा नाट्य प्रशिक्षण शिबीर व कै. डॉ. विश्वास देशमुख दीर्घांक महोत्सवाने रंगभूमीला दिली नवी दृष्टी

**नांदेड (प्रतिनिधी)-** येथील रंगभूमीला समृद्ध करणारा आणि रसिकांना वैविध्यपूर्ण रंगानुभव देणारा कै. जनार्दन आत्माराम चितळे युवा नाट्य प्रशिक्षण शिबिराचा समारोप व कै. डॉ. विश्वास देशमुख दीर्घांक महोत्सव डॉ. शंकरराव चव्हाण नाट्यगृहात उत्साहात पार पडला.

तन्मय ग्रुप व लीला आर्ट्स फाउंडेशनच्या विद्यमाने आयोजित या महोत्सवात मयुरी रवींद्र (मुंबई) लिखित-दिग्दर्शित 'भिर्रररर' आणि लेखिका-सादरकर्ती शीतल राऊत यांचे 'आबा का जाबा का' हे दोन भिन्न आशयधर्मी प्रयोग सादर झाले. ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. नाथा चितळे यांच्या पुढाकाराने नांदेडच्या रसिकांना या दर्जे



दार कलाकृतींचा अनुभव मिळाला.

उद्घाटनप्रसंगी खंडू गुरू असोलेकर, मुक्ताई प्रतिष्ठानचे सचिव राजेश महाराज देगलूरकर, नाट्य परिषदेच्या नांदेड शाखेच्या अध्यक्षा अपर्णा नेरलकर, शिबिराचे मुख्य संयोजक व ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. नाथा चितळे, शिबीर प्रमुख अक्षत सूर्यवंशी, उपप्रमुख आदित्यराज उदावंत, कार्यक्रमाधिकारी स्नेहा कदम, स्त्री संघटक रिया पावडे उपस्थित होते. कै. ज्ञानेश्वर गायकवाड स्मृतीप्रित्यर्थ उत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून गोविंद शिंदे यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजीवनी नेरकर यांनी केले.

'भिर्रररर' हा प्रयोग लोकस्मृती, ओव्या, ग्रामीण स्त्रीजीवन आणि आत्मनिर्भरतेच्या प्रवासाचे प्रभावी रंगरूप ठरला. जान्हवी मराठे आणि मयुरी रवींद्र या दोनच अभिनेत्रींच्या बहुपदरी अभिनयातून अब्दुल्लाटच्या सामायिक इतिहासापासून शेतकरी स्त्रीच्या संघर्षापर्यंतचा विस्तीर्ण पट रंगमंचावर उलगडला. ओवी ही केवळ लोकपरंपरा न राहता कथानकाची लय, स्त्रीचा अंतःस्वर आणि सामूहिक स्मृतीचे नाट्यतंत्र बनते. हास्य, करुणा, लोकबोली, देहबोली आणि गीत-संवाद यांच्या संगमातून प्रयोगाची नाट्यगती सतत उंचावत जाते. आशाताईंच्या संघर्षातून आर्थिक स्वावलंबनाकडे झालेला प्रवास हा प्रयोगाचा आशावादी उत्कर्षबिंदू ठरतो. दोन अभिनेत्रींच्या अफाट ऊर्जे चा, अभिनयाच्या ताकदीचा आणि रंगभूमीवरील जिवंतपणाचा अनुभव नांदेडच्या नाट्यरसिकांनी अनुभवला.

नाटकाच्या आशयाला अधिक परिणामकारक करणारी प्रकाशयोजना, संगीत आणि ध्वनीयोजना अत्यंत दर्जेदार आणि व्यावसायिक वाटली. रंगमंचावरील प्रत्येक तांत्रिक घटक हा कथानुभवाचा अविभाज्य भाग बनला होता.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com